|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : ४ सोमवार दि. १७ जानेवारी २०२२ ते रविवार दि. २३ जानेवारी २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## दोघांच्या शरीरसुखाच्या बंद होताच वाटा प्रियकराने काढला प्रेयसीच्या पतीचा काटा

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर

शरीरसुखाला आसुसलेला पुरुष असो कि बाई त्यांना जगाची परवा नसते. लाजलज्जा आणि सामजिक मर्यादांच उल्लंघन करून त्या अनैतिक संबंधाच्या डोहातील सुखात आकंठ बुडालेले असतात. अशावेळी त्यांच्या मार्गात जर कुणी आले, तर त्याचा काटा काढताना त्यांना नात्या गोत्याचीही ओळख राहत नाही. यवतमाळ जिल्ह्यातील वणी नजीकच्या रास गावातील रेखाच्या बाबतीतही असेच घडले. पती कमी पडत असल्याने तिने दुसऱ्याला जवळ केले ...पान २ वर

# गोबर गॅसच्या टाकीत मारून टाकले निष्पाप जीवांना निष्ठूर डॉक्टरणीने हॉस्पिटलला बनवले कसाई खाना





वर्धा/क्राईम रिपोर्टर

**वैद्यकीय सेवा हि ईश्वर सेवा म्हणून ओळखली जाते. तर वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टरांना देवदूत समजले जाते. पण जेंव्हापासून वैद्यकीय क्षेत्राचे पूर्णपणे व्यावसायी करण झाले आहे, तेंव्हापासून वैद्यकीय सेवा हा धर्म राहिला नसून तो धंदा बनला आहे. त्यामुळे देवदूत समजले जाणारे डॉक्टर आता व्यापारी बनले आहेत आणि त्यांनी ठिकठिकाणी आपली दुकाने थाटून रुग्णांवर उपचार करण्याच्या नावाखाली त्यांना लुटण्याचे धंदे सुरु केले आहेत. पैशासाठी त्यांची काहीही करायची तयारी आहे. एखाद्याला रजेसाठी खोटे मेडिकल सर्टिफिकेट देण्यापासून ते मृत्यूचा खोटा दाखला देण्यापर्यंत सर्वकाही झोलझपाटे करण्यात आजकालचे डॉक्टर पटाईत आहेत. त्याचबरोबर सरकारी कायदे धाब्यावर बसवण्यात डॉक्टरांचा कुणीही हात धरू शकत नाही. म्हणून तर गर्भलिंग निदान आणि गर्भपात करणे कायद्याने गुन्हा असतानाही आजही अनेक ठिकाणी बेकायदेशीर गर्भलिंग निदान केले जातेय. अल्पवयीन मुलींचे गर्भपात करून त्यांच्या गर्भातील भ्रृणांची हत्या केली जातेय. अडीज वर्षांपूर्वी बीडमध्ये सुदाम मुंडे नावाच्या एका डॉक्टरने आपल्या नर्सिंग होममध्ये बेकायदेशीर गर्भपात करून मुलींच्या गर्भातले भ्रूण मारून टाकण्याचा धंदाच सुरु केला होता. पण त्याच्या या पापाला वाचा फुटताच पोलिसांनी त्याला आणि त्याच्या पत्नीला अटक करून तुरुंगात डांबले. त्यानंतर तरी बेकायदेशीर गर्भपात आणि भ्रूण हत्येचे हे प्रकार थांबतील असे वाटले होते. पण तसे झाले नाही. हे प्रकार सुरूच आहेत. सुदाम मुंडे हा पुरुष डॉक्टर होता. त्यामुळे तो उलट्या काळजाचा असू शकतो हे समजण्यासारखे होते. पण आता महिला डॉक्टर सुद्धा यात मागे राहिलेल्या नाहीत. वर्धा जिल्ह्यातील आर्वीमध्ये असलेल्या कदम हॉस्पिटलमध्ये बेकायदेशीर गर्भपात करून अनेक भ्रूण हत्या केल्याची भयंकर घटना उघडकीस आली असून रुग्णालयाच्या गोबर टाकीत १२ मानवी कवट्या आणि ५४ हाडे सापडली आहेत. या प्रकरणी रुग्णालयाच्या संचालिका डॉ. रेखा कदम यांच्यासह चौघांना अटक करण्यात आली आहे.**

अत्यंत संतापजनक अशा या घटनेची सुरुवात एका अल्पवयीन मुलीच्या गर्भपातापासून झाली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार आर्वीमध्ये राहणार एका १३ वर्षांच्या मुलीशी शेजारच्या १७ वर्षांच्या मुलाने जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवले होते. त्यातून ती गर्भवती राहिली. मात्र तिने हि माहिती लपवून ठेवली आणि पाचव्या महिन्यात तिला त्रास होऊ लागल्याने तिने आईला सांगितले. त्या नंतर डॉक्टरकडे गेल्यावर ती पाच महिन्याची गर्भवती असल्याचे समजले. त्यानंतर ज्या मुलाने तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले होते. त्याच्या आई वडिलांनी मुलीचा गर्भपात करण्यासाठी मुलीच्या पालकांवर दबाव आणला. मात्र हे धोकादायक होते. अखेर त्यांना कोणी तरी सांगितले कि कदम हॉस्पिटलमध्ये गर्भपात होऊ शकतो. तेंव्हा त्या मुलीला कदम हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तिथे या हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. रेखा कदम यांनी ३० हजार रुपये घेऊन मुलीचा गर्भपात केला. मात्र या घटनेची माहिती आर्वी पोलिसांना समजताच त्यांनी मुलीच्या आई-वडिलांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून सर्व माहिती घेतली आणि रेखा कदम यांच्या कदम हॉस्पिटलवर ...पान २ वर

## लग्नाच्या तगाद्यामुळे प्रियकर पुरता हैराण झाला मेव्हण्याला अडकवण्यासाठी प्रेयसीचा खून केला



कराड/क्राईम रिपोर्टर

**काही लोक इतके शातिर दिमाग असतात कि एकाच दगडात दोन पक्षी मारण्याचा प्रयत्न करतात. पण कधी कधी हे प्रयत्न त्यांच्या अंगाशी येतात आणि त्यांनी दुसऱ्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात ते स्वतःच पडतात. कराड जवळच्या येरावले गावातील शरद ताटे याचेही तसेच झाले होते. एकीकडे प्रेयसी लग्नासाठी तगडा लावत होती, तर दुसरीकडे त्याचा मेव्हणा त्याच्या बहिणीला नांदवत नव्हता. त्यामुळे बहिण माहेरी येवून राहिली होती. अखेर या दोन्ही प्रकरणातून मार्ग काढण्यासाठी त्याने एक भयंकर कट रचला. त्याने प्रेयसीचा खून करून मेव्हण्याचे आधार कार्ड आणि त्याच्यावर आरोप करणारी प्रेयसीच्या नावाने लिहलेली चिट्ठी तिच्या पर्समध्ये टाकली. जेणेकरून तिच्या खुनाचा आळ मेव्हण्यावर जावा आणि एकाच दगडात दोन्ही पक्षी मारले जावेत. पण पोलिसांनी त्याचा हा डाव उधळून त्याला अटक केली.**

कराड जवळी येरवळे येथे शरद हणमंत ताटे हा आपल्या कुंटूबासह राहयला आहे. त्याच्या बहिणीचे गेल्या पाच सहा वर्षापूर्वी लग्न झाले असल्याने ती तिच्या सासरी नवऱ्याबरोबर राहयला आहे.परंतू गेल्या दोन तीन वर्षापासून त्याच्या बहिणीचे आणि तिच्या नवऱ्याचे फारसे काही पटत नव्हते. तिचा नवरा तिला सारखा दारू पिऊन मारहाण करीत असल्याने ती सारखी आपल्या माहेरी येरवळे येथे येवून राहत होती. त्या नवरा बायकोची भांडणे मिटवता मिटविता शरदला नाकी नऊ आले होते. आई वडिल वयोवृध्द असल्याने नवरा बायकोची समजूत त्यालाच घालावी लागत होती. त्याने बहिणीला आणि दाजीला ही बऱ्याचवेळेला समाजावून सांगितले होते. त्याची भांडणे चार लोकांना घेऊन मिटवली होती. परंतू एक दोन आठवडे गेले की, परत त्या नवरा बायकोची भांडणे जुपत होती. त्यामुळे शरद ही त्याची भांडणे मिटवून थकला होता. अलिकडे तर त्याचा दाजी त्याच्या बहिणीला नांदावायला तयार नव्हता. तो तिच्यावर चारित्र्याचा संशय घेऊन तिच्याकडे काडीमोड मागत होता. त्यामुळे शरदला ...पान २ वर

## वसईत सिक्युरिटी गार्डची नोकरी करून घरफोडी करणाऱ्या नेपाळी टोळीला अटक



वसई/क्राईम रिपोर्टर

सिक्युरिटी गार्डची नोकरी करून घरफोडी करणाऱ्या एका नेपाली टोळीला माणिकपूर पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत भारत-नेपाल सीमेवरून ५२४४८० रुपयांच्या मुद्देमालासह अटक केली आहे. माणिकपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सनसिटी भागातील कदमगिरी इमारतीमध्ये राहणारे व्यावसायिक मेहुल कमलेश शहा यांच्या नातेवाईकाचे निधन झाल्यामुळे ते कुटुंबासह गावी गेले होते. त्याचाच फायदा घेऊन सोसायटीतील सिक्युरिटी गार्डने आपल्या तीन साथीदारांना बोलावून मागच्या बाजूच्या टॉयलेटच्या ...पान ६ वर

# दारूच्या नशेत फुशारकी अंगाशी आली आठ वर्षांनी मारेकऱ्याला अटक झाली









जळगाव/क्राईम रिपोर्टर

**काही लोकांना दुसऱ्यांच्या समोर फुशारक्या मारण्याची सवय असते आणि दारू पोटात गेली कि माणूस शेर बनतो आणि अधिकच फुशारक्या मारू लागतो. दारूच्या नशेत नको ते बोलून जातो. पण फुशारक्या मारण्याची त्यांची हीच सवय कधी कधी त्यांच्या गळ्याचा फास बनू शकते. सुरतमध्ये राहणाऱ्या वाल्मिकीच्या बाबतीत असेच झाले. आठ वर्षापूर्वी त्याने त्याच्या आईच्या प्रियकराचा खून केला होता. पण त्या खुनाबद्दल पोलिसांना कोणताही पुरावा न सापडल्याने त्या प्रकरणाची फाईल बंद करण्यात आली होती. मात्र एकेदिवशी दारूच्या नशेत त्याचा काही लोकांशी वाद झाला. यावेळी माझ्या नादाला लागू नका मी खून केला आहे आणि ८ वर्ष झाली तरी मला पोलीस पकडू शकले नाहीत अशी फुशारकी त्याने मारली आणि तीच त्याच्या अंगाशी आली. पोलिसांना हे समजताच त्यांनी वाल्मिकीला अटक केली आणि ८ वर्षानी एका खुनाचा पर्दाफाश झाला. नशेत मारलेली फुशारकी अंगाशी आली आठ वर्षानी मारेकऱ्याला अटक झाली.**

वाल्मिक रमेश चौधरी लहान असतांनाच त्याच्या वडीलांनी दुसरे लग्न केले होते. दुसऱ्या पत्नीसोबत अर्थात वाल्मिकच्या सावत्र आईसोबत त्याचे वडील त्यांच्या मुळ गावी कुसुंबा येथे रहात होते. वडिलांनी दुसरे लग्न केल्यानंतर वाल्मिक त्याच्या आईसोबत गुजरात राज्यातील सुरत येथे राहण्यास आला. त्यांची आईनेच त्याला आईसह बापाचे प्रेम दिले. सुरत शहरातील पांडेसरा येथे दोघे मायलेक मोलमजुरी करुन दिवस काढू लागले. वाल्मिकची आई ...पान २ वर

## चारित्र्याचा संशय प्राणावर बेतला पतीने अखेर पत्नीचा जीव घेतला

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी





मयत अश्विनी


**पती-पत्नीमध्ये जर सामंजस्य नसले आणि दोघांचा एकमेकांवर विश्वास नसला तर त्यांच्या संसाराला ग्रहण लागते आणि मग त्यातून घरात कलह निर्माण होतो. हा गृह कलह जर वेळेवर मिटवला नाही तर त्यातून वाद वादात जातात आणि मग पती पत्नी मधील प्रेमाच्या जागी सुडाची भावना निर्माण होते. विश्वासाच्या जागी संशय आणि तिरस्कार निर्माण होतो. त्यामुळे संसारात कितीही वाद झाले तरी ते ताणायचे नसतात. अनैतिक संबंधातून वाद असतील तर निदान समाजाच्या भीतीने तरी तसले संबंध संपवायचे असतात. मुळात संसारात संशयाचे वातावरण निर्माण होणार नाही याची पती पत्नी दोघांनीही काळजी घ्यायची असते. पण काही लोकांना ते जमत नाही आणि मग अशा संशायातून झालेल्या वादात एखाद्याचा जीव जातो. माढा तालुक्यातील दहिवली गावात एका इसमाने चारित्र्याच्या संशयातून पत्नीच्या छातीत लोखंडी सळई घुसवून तिचा जीव घेतला, या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीस अटक केली आहे.**


चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा छातीवर लोखंडी सळई मारून ठार मारल्याची घटना माढा तालुक्यातील दहिवली या गावात रविवारी घडलेली आहे. याबाबत टेंभुर्णी पोलीस ठाण्यामध्ये ...पान ६ वर

# पुतणीच्या कौतुकाने काकीचा जळफळाट झाला रागाच्या भरात तिने छोट्या मानवीचा खून केला









यवतमाळ/क्राईम रिपोर्टर

**ज्या महिला संकोचित आणि स्वार्थी वृत्तीचा असतात त्यांना दुसऱ्याचे चांगले झालेले बघवत नाही. अशावेळी त्यांचा जळ फलाट होत असतो आणि त्यातूनच त्यांच्या मनात दुसऱ्याचे वाईट करण्याचे विचार येत असतात. यवतमाळ जिल्ह्यातील कुजहा डूमनी गावात दीपाली चोले नावाची महिला अशीच जळक्या वृत्तीची होती. तिच्या दिराच्या मुलीचे गावात सर्वत्र कौतुक केले जायचे, पण तिच्या मुलांना कोण विचारीत नसे. या गोष्टीचा तिला भयंकर राग होता आणि याच रागातून तिने आपली सख्खीपुतणी मानवी हिचे अपहरण करून तिचा निर्घुणपणे खून केला आणि मृतदेह घरातच लपवून ठेवला. मात्र अशा गोष्टी लपून राहत नसतात. शेवटी काकीचे बिंग फुटले आणि पोलिसांनी तिला अटक केली.**

यवतमाळ जिल्ह्यात कुजहा डूमनी नावाचे तुरळक लोकवस्तीचे एक गाव आहे. आर्णी-माहूर रस्त्यावर असलेल्या या गावात केवळ दीडशे ते दोनशे घरे आहेत. या गावात अविनाश चोले हे आपल्या कुटुंबासह राहतात. जवळचा त्यांचा चुलत भाऊ गोपाल चोले हा देखील राहतो. अविनाश चोले यांना दोन मुली असून त्यापैकी मानवी ही तीन वर्षाची आहे. गोपाल चोले यांना दोन मुले आहेत. अविनाश चोले यांची तीन वर्षाची मुलगी मानवीचे गावातील सर्वजण लाड व कौतुक करत होते. मानवीचे होणारे कौतुक गोपालची पत्नी दिपाली आवडत नव्हते. तिच्या मनात मानवीबद्दल राग होता. सर्व जण केवळ मानवीचे कौतुक करतात व माझ्या मुलांचे कुणी कौतुक करत नाही अशी तिच्या मनात खंत ...पान ६ वर

# प्रेयसीच्या बाळाची प्रियकरानेच विक्री केली लहान मुले पळवणाऱ्या टोळीची धरपकड झाली

मुंबई/एस.कुमार

**आजकाल कोणावर सहजासहजी विश्वास ठेऊ नये. कारण कोणाच्या मनात काय असेल हे सांगता येत नाही. मुंबईतील व्हीपी रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका महिलेचे बाळ तिच्याच प्रियकराने विकल्याची संतापजनक घटना समोर आली होती. मात्र पोलिसांनी प्रयत्नांची शिकस्त करून तामिळनाडू मधून त्या बाळाला आणले आणि मुले पळवणाऱ्या सहा जणांच्या टोळीला गजाआड केले.**





दिनांक ३ जानेवारी २०२२ रोजी ९:१५च्या सुमारास एक महिला व्ही .पी. रोड पोलीस ठाण्यात आली. पोलिसांनी तिला पोलीस ठाण्यात येण्याचे कारण विचारलं असता, ती रडत-रडत सांगू लागली. साहेब माझे नाव अन्वरी अब्दुल रशीद शेख (वय ५०) आहे. माझ्या चार महिन्याच्या बालिकेला लस देण्याच्या बहाण्याने आरोपी इब्राहिम शेख याने २७ डिसेंबर रोजी तिच्या घरातून बाळाला नेलं. मात्र तो परत आलाच नाही. त्याची तक्रार द्यायला मी पोलीस ठाण्यात आले ,असे या महिलेने सांगितलं. तेव्हा व्ही पी रोड पोलीस ठाण्याच्या महिला वरिष्ठ पोलीस निरीक्षक संध्याराणी भोसले यांनी या महिलेची तक्रार लिहून घेण्यास सांगितले. त्यानुसार महिलेच्या तक्रारीवरून व्ही पी रोड पोलीस ठाण्यात गु. र. क्र. ०३/२०२२ कलम ३६३, ३७० (४), ३४ भादंवि सह कलम ८१, ८७ जे. जे. ॲक्ट अन्वये नोंद करण्यात आला. एका चार महिन्याच्या बलिकेला पळवून नेल्याने परिसरात खळबळ उडाली होती. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल ...पान ६ वर

## पान १ वरून....

### गोबर गॅसच्या टाकीत मारून टाकले...

धाड टाकली. यावेळी पोलिसांनी हॉस्पिटलच्या मागे असलेली गोबर गॅसची टाकी उघडून पहिली असता त्यात ११ मानवी कवट्या आणि ५४ मानवी हाडे सापडली. त्यानंतर ती सर्व हाडे आणि कवट्या फॉरेन्सिक लॅबकडे पाठवून पोलिसांनी डॉ.रेखा कदम त्यांची परिचारिका संगीता काळे आणि मुलीच्या आई वडिलांना अटक केली. त्यानंतर त्या संपूर्ण परिसरात खोदकाम करण्याचे काम सुरु झाले असून काल आणखी एक कवटी सापडली. याचा अर्थ या ठिकाणी अनेक मुली आणि महिलांचे गर्भपात करण्यात आले होते. तसेच गर्भपात ऑपरेशन फेल होऊन मृत्युमुखी पडलेल्या महिलांना इथे गाडण्यात आले असावे असा पोलिसांना संशय असून या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. तसेच सध्या रेखा कदम यांची कसून चौकशी सुरु आहे. या घटनेनंतर केवळ पोलिसाच नव्हे, तर सरकारही हादरले असून यापुढे गर्भलिंग परीक्षण आणि बेकायदेशीर गर्भपात रोखण्याचे आरोग्य खाते आणि पोलिसांना कठोर आदेश देण्यात आले आहेत. तसेच या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी केली जाणार आहे.

### दोघांच्या शरीरसुखाच्या बंद होताच...

आणि त्याच्या सोबत मजा मारू लागली. मात्र हि गोष्ट पतीला समजताच तो विरोध करू लागला. त्याने तिच्या प्रियकराला ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे दोघांनी मिळून तिच्या पतीचा काटा काढण्याचा कट रचला आणि रेखासाठी तिच्या प्रियकराने आपल्या साथीदारांच्या मदतीने तिच्या पतीचा खून केला. वणी जवळील रासा येथे निलेश सुधाकर चौधरी हा ३० वर्षीय तरूण आपल्या पत्नी मुलासह राहत होता. तो मिळेल ते काम करून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत असल्याने कामाच्या शोधात त्याला सारखे बाहेर गावी जावे लागत होते. त्याची पत्नी रेखा (काल्पनिक नांव) ही देखणी आणि सुंदर होती. वयाच्या २५ वीशीतल तिची सळसळती जवानी बघून अनेकजण चेकाळत होते. रेखाला आपल्या मिठीत घेणेसाठी निलेशचे अनेक मित्र धडपडत होते. तशी ती चालू असल्याने तिची नजर ही सावध शोधत असायची अशातच तिची ती भिरभिरती नजर निलेशचा मित्र चंद्रशेखर दुर्गे याने हेरली होती. तो निलेशबरोबर सारखा त्याच्या घरी येत असल्याने तो तिच्याकडे, तिच्या जवानीकड चोरून एकटक बघत असायचा हे रेखाने ही हेरले होते.ती त्याला अलिकडे लाईन देवू लागली असल्याने तो ही तिला खुणावा खुणवी करू लागला. अखेर असे करता करता ती त्याच्या जाळ्यात अडकलीच.तिच्या आरसपानी सौंदर्याने तो वेडा झाला असल्याने तिला मिठीत घेणेसाठी तो उतावीळ झाला होता. तो तशी संधी शोधत होता आणि तशी संधी त्याला एकदा मिळाली. कामाच्या निमित्याने निलेश हा बाहेर गावी गेला असताना चंद्रशेखर हा मुद्दामाच तिच्या घराकडे आला. ती घरात एकटी असल्याचे बघून वहिनी वहिनी म्हणत तो तिच्याशी गप्पा मारत बसला असताना त्याची चुळबुळ वाढली होती. अशातच तिने मुद्दामच आपला पदर खाली सरकविल्यावर तिच्या दोन्ही टपोऱ्या गोळ्याच्या दर्शनाने तो जीभ चाटू लागला.तिने त्याचा बहाणा ओळखून काय भावोजी काय इरादा आहे असे सहजच म्हटल्यावर तो ही तिला लाडीकपणे जवळ करीत तिच्या मांडया दाबून तो त्याचेवरून हात फिरवू लागला. तशी ती ही तयारीत असल्याने तिने त्याला खुले निमंत्रण दिले. तसे त्याने तिला आपल्या मिठीत घेत दाबादाबी करीत तिची साडी बाजुला करून तिच्या कोमल अंगावरून हात फिरवू लागल्यावर ती भावोजी जास्त तडपडू नका. आग लागली  आहे आग लागली आहे ती विझवा. तिने तसे म्हणाताच त्याने आपले कपडे काढून तिला बेडवर आडवे करीत आपल्या अंगाखाली घेतले. आता दोघे ही निर्ववस्त्र झाल्यावर त्याच्या खेळाला सुरूवात झाली.पहिल्या फेरीतच तो तिला असे खेळवू लागला की ती त्याच्या दमदार कुस्करण्याने घायतीला आली. त्याने दमदार खेळाला सुरूवात केली होती. तो तिच्या नागडया अंगावर पडून जोर जोरात धक्के मारत असताना ती ही त्याला खालून भावोजी म्हणत साथ देत होती.त्या दोघांचा खेळ रंगात आला होता. आलेल्या संधीचा फायदा घेत त्याने रेखाला असे काही खेळवले की तिला आता दमदार गडी मिळाल्याचे वाटले. त्या वेळेपासून त्या दोघांच्या विवाहबाहय संबंधाला सुरूवात झाली. त्या दोघांचे विवाहबाहय संबंध गेल्या तीन वर्षापासून सुरू होते.नवरा बाहेर गावी गेला की रेखा त्याला आपल्या अंगावर घेऊन खेळवत होती. त्याच्या सारखे घरी येण्याने आजूबाजूला त्या दोघांच्या त्या संबंधाची चर्चा होऊ लागली तशी ती चर्चा निलेशच्या कानावर देखील आली. याबाबतच त्याने जाब रेखाला विचारल्यावर तिने आपल्या कानावर हात ठेवीत आपण त्यातील बाई नाही आणि आपले तसले कोणतेही संबंध नाहीत असे तिने सांगितले. तरी ही निलेशला त्या दोघाच्या संबंधाची कल्पना आल्याने तो त्या दोघाच्यावर वॉच ठेवून होता. तसे ते दोघे ही त्याला एकदा रंगेहात सापडले. त्यावेळी त्याने रेखाला जबर मारहाण करीत चंद्रशेखर याला ही जीवे मारण्याची धमकी दिली होती. परत जर माझ्या घराकडे आलास आणि माझ्या बायको बरोबर संबंध ठेवलास तर तुला सोडत नाही असे तो त्याला म्हणाला.त्यावेळेपासून चंद्रशेखर हा तिला भेटू शकत नव्हता. दिवसामागून दिवस जात होते. रेखाला त्याची सारखी आठवण येत असल्याने ती त्याला मोबाईलवर फोन करून भेटालयला बोलवत होती.इकडे रेखाच्या बदफैली वागण्याने निलेश जास्तच दारू पिऊ लागला होता. दारू पिऊन आला की या कारणातून तो रेखाबरोबर भांडण काढून मारहाण करीत होता.रेखा ही तयारीची असल्याने ती त्याचा मार खावून त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत त्याला म्हणाली, तुझ्यात दम नाही दुसऱ्याला कशाला नावे ठेवतोस तिच्या या उत्तराने निलेश हा जास्तच तिच्यावर चिडला होता. तुला माझ्यापेक्षा तोच जास्तच पाहिजे काय म्हणत तिला मारहाण करीत होता. इकडे रेखाला त्या कामासाठी प्रियकर चंद्रशेखर पाहिजे असल्याने ती त्याला बोलावत होती.पण त्या दोघात आता निलेशचा अडथळा होता. म्हणून तिने प्रियकर चंद्रशेखर याला सांगितले की,मी तुला पाहिजे असल्यास माझ्या नवऱ्याला संपव आणि माझ्याकडे ये.त्याने तिला आपल्या राणीची अशी काही झलक दाखविली होती की तो तिच्यासाठी काही ही करू शकत होता. म्हणून त्याने निलेश चौधरी याला मारण्यासाठी रेखाच्या मदतीने एक प्लॅन केला. त्या प्लॅनमध्ये त्याने आपल्या जवलच्या तिघा मित्रांना सामील करून घेतले. ठरलेल्या प्लॅनप्रमाणे चंद्रशेखर याने निलेशला पार्टीसाठी दि.२८ ऑगस्टला फुलोरा येथील जंगलात बोलावून घेतले. त्यावेळी तेथे चंद्रशेखर याचे मित्र योगेश उघडे, अशिष पिदुरकर आणि गौरव दोरखंडे हे तिघे जण तेथे आधीच होते. निलेश हा तेथे आल्यावर त्यांनी त्याला दारू पाजली. दारूचा त्याचेवर अंमल झाल्यावर चंद्रशेखर याने मुद्दामच रेखाचा विषय काढला. ती तुझी बायको असली तरी ती माझी प्रियेसी आहे. आणि तू आमच्या दोघांच्यातून बाजुला हो, असे म्हटले. आपल्या बायकोविषयी दोघा मित्रासमोर चंद्रशेखर अपशब्द बोलत आहे हे बघून निलेश चवताळला होता. त्याने त्याला शिव्या दयायला सुरूवात केल्यावर चंद्रशेखर आणि त्याच्या मित्रांनी निलेशला मारायला सुरूवात केली. या मारहाणीत ते निलेशला खाली पाडून बडवत होते. त्यातच चंद्रशेखर याने निलेशचा गळा जोरात आवळून धरला. त्याच्या तावडीतून निलेश हा सुटण्याचा प्रयत्न करीत असताना योगेश उघडे आणि गौरव दोरखंडे यांनी त्याला दाबून धरले. चंद्रशेखर याने त्याचा गळा जोरात आवळून धरल्यावर निलेश याची तडफडत मंदावली होती. काही वेळातच तो गतप्राण झाला. त्याचा आपल्या मारहाणीत मृत्यू झाल्याचे लक्षात येताच चंद्रशेखर आणि त्याच्या मित्राच्या पायाखालची वाळू सरकली. आता त्यांनी त्याला मारून त्याच्या आत्महत्येचा बनाव करण्याचा प्लॅन केला. यासाठी त्यांनी त्याचा मृतदेह फुलोरा जंगलातील तलावाजवळ असलेल्या एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत लटकविला. त्यानंतर ते तेथून निघून गेले.दुसऱ्या दिवशी २९ ऑगस्ट रोजी लोकांना झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत निलेश याचा मृतदेह दिसून आल्यावर त्यांनी या घटनेची माहिती वणी पोलीसांना दिली. पोलीस ही माहिती मिळाल्यावर तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीस घटनेचा पंचनामा करीत असताना त्याने निलेशच्या गळयावर कशाने तरी आवळ्याचे खुणा दिसत होत्या. त्यामुळे पोलीसांना ही आत्महत्या आहे की घातपात याचा संशय येत होता. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये निलेश याचा गळा आवळ्याने मृत्यू असे लिहिले होते. त्यामुळे पोलीस या घटनेचा नव्याने तपास करीत असताना त्याना निलेशच्या खुनासंर्दभात काही माहिती मिळाली होती. पोलीसांनी रेखाकडे या घटनेची चौकशी करीत पण ती पोलीसांना ताकास तूर लागू देत नव्हती. त्यातच पोलीसांना गुप्त खबऱ्यांनी माहिती दिली की, मयत निलेश याची पत्नी रेखा हिचे चंद्रशेखर दुर्गे याच्याबरोबर विवाहबाहय अनैतिक संबंध होते. तिच्या सांगण्यावरून तिचा प्रियकर चंद्रशेखर दुर्गे याने निलेशचा गळा आवळून त्याने खून केला असून या घटनेत त्याचे आणखीन तिन मित्र सामील आहेत. घटनेच्या दिवशीचे मयत निलेश आणि रेखा हिचे मोबाईल कॉल डिटेल्स पोलीसांनी काढले असता. रेखा हिच्या मोबाईलवर चंद्रशेखर दुर्गे याचा कॉल अनेकवेळा आला असल्याचे दिसून आले.पोलीसांनी या घटनेचा तांत्रीक दृष्टया तपास करून या घटनेतील संशयीत आरोपी चंद्रशेखर दुर्गे गौरव दोरखंडे, आशिष पिदुरकर आणि योगेश उघडे याना ताब्यात घेऊन त्याचेकडे निलेश चौधरी याच्या हत्येविषयी चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. त्यांनी गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी निलेश चौधरी (वय ३०) याचा खून करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी चंद्रशेखर दुर्गे (वय २८) योगेश उघडे (वय २५) अशिष पिदुरकर (वय २२) आणि गौरव दोरखंड (वय २३) याच्या विरोधात मयत निलेश चौधरी याच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरून भा.दं.वी.कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना मा.कोर्टासमोर हजर केले असता. मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या घटनेचा तपास वणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आंनद पिंगळे हे करीत आहेत.

### लग्नाच्या तगाद्यामुळे प्रियकर पुरता...

अवघड झाले होते. त्यातच बहिण सारखी माहेरला येवून राहत असल्याने त्याचे लग्न ही जमत नव्हते. यातच जर तिचा काडीमोड झाला तर आपले लग्नच जमणार नाही असे त्याला वाटत होते. भावकीतील पै पाहुण्यातील काही वयस्कर लोक घेऊन त्याने त्या दोघात परत परत समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याचा दाजी काही त्याचे ऐकयाला तयार होत नव्हता. उलट तो काडीमोडसाठी जास्त प्रयत्न करीत होता. याचा अर्थ शरदने बरोबर ओळखला होता. त्याला आता खात्री पटली होती की, त्याचा दाजी बहिणला काही केल्या नांदवणार नाही म्हणून त्याने आता दाजीलाच कायमचा धडा शिकवयाचा असा विचार केला. शरद हा पाटण येथील वनिता सांळुखे या विवाहित महिलेच्या नादी लागलेला होता. ते दोघे ही प्रियकर प्रियेसी प्रमाणे वागत होते. वनिता ही शरद बरोबर गुलछर्रे उडवित त्याचेबरोबर रंगरलिया करीत फिरत होती. तिला ही नवऱ्याने सोडल्याने तिच्यावर कोणाचे बंधन नव्हते. शरदकडून ती पाहिजे ते मागून घेत होती.त्या बद्दल्यात त्याला ती शरीर सुख देत असल्याने तो तिचा यजमान आणि ती त्यवाची रखेल बनली होती. त्या दोघांच्या संबंधाची माहिती दोघाच्या ही घरच्या लोकांना होती. त्याच्या संबंधाना त्याचा कधी विरोध नव्हता. ते दोघे ही लग्न करणार असल्याने त्यांनी कधीच त्याच्या संबंधाला आक्षेप घेतला नव्हता. वनिताला ही शरदच्या घरची पुर्ण माहिती होती. त्याच्या बहिणीचे काय चालले आहे. त्यामुळे शरद कसा अडचणीत आला आहे हे तिला चांगले माहित होते.ती शरदला आपण लग्न करूया म्हणून मागे लागली होती. पण त्याच्या डोक्यात त्याच्या बहिणीचा विषय असल्याने तो तिच्याशी लग्न करायला नकार देत होता. माझ्या बहिणीचा प्रॉब्लेम मिटू दे मग आपण लग्न करूया असे तो वनिताला सांगत होता. ती मात्र त्याचेकडे लग्नाचा हट्ट करून धरत होती. त्यामुळे शरद आता दोन्ही बाजूनी वैतागलेला होता. लग्नासाठी प्रियेसीचा हट्ट तर दुसरीकडे दाजी बहिणाला देत असलेला त्रास याने तो जाम वैतागलेला असताना त्याने आता आपल्या दाजीलाचा कायमचा धडा शिकवयाचा असा विचार केला. त्यासाठी त्याने तसा प्लॅन केला. दाजीला धडा शिकविणेसाठी म्हणून त्याने आपल्या प्रियेसीचा वापर करण्याचे ठरविले आणि तसे त्याने केले ही. दि.३ जानेवारी २०२२ रोजी पाटण हून वनिताला कराडला बोलावून घेतले. त्या दिवशी दोघांनी ही बाहेर फिरून यथेच्छ मजा मारली तिला एका हॉटेलात घेऊन जावून तिच्याबरोबर शारीरिक सुख ही घेतले. त्यावेळी तिने परत त्याच्याकडे लग्नाचा हट्ट धरल्याने तो तिच्यावर चिडला. मी लग्न करतो म्हणून सांगितले असताना तू इतका का हट्ट करतेस म्हणून तो तिच्याबरोबर भांडू लागला. त्यावेळी वनिता ही त्याला रागाच्या भरात म्हणाली,तुला झोपायला मी पाहिजे आणि लग्नाला नकार देतोस असे म्हणून तिने त्याचेवर तोंडसुख घेतले. आता हिच संधी आहे हे ओळखून तिला परत आपल्या टू व्हिलर गाडीवर बसवून कराड पासून दोन किमी अंतरावर असणाऱ्या कार्वे कोरेगाव रस्त्यावर आणले.रात्रीच्या वेळी फारसी गर्दी नसल्याने त्याने तिला चल की ऊसात परत एकदा मजा मरू म्हटले. ती ही त्याला नाही होय म्हणत ऊसाच्या शेतात गेली.गोड बोलत त्याने तिला ऊसाच्या शेतात आडवी करत परत एकदा काम केले. काम करता करता ते दोघे भांडत  होते. त्यातच रागाच्या भरात त्याने तिचा गळा जोरात दाबून धरला. त्यासरशी ती सोड मला म्हणत ओरडू लागली.तसे त्याने तिचा गळा जोरात आवळला.तिचा श्वास गुदमरला ती तडफडू लागली. ती हात पाय टाचा घासत असताना तो तिच्याजवळ नागडया अंगावरून उठला आणि बाजुलाच पडलेला दगड उचलून तिच्या डोक्यात जोरात हाणला. त्यासरशी तिचे डोके फुटून रक्ताची धार लागली. काही वेळातच ती निपचिप झाली. तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे लक्षात येताच त्याने चालखपणाने या खूनात आपल्या दाजीला अडकविणेसाठी त्याच्या नावाच्या आधारकार्डची झेरॉक्स तिच्या पर्स मध्ये टाकली. त्याचबरोबर एक चिठ्ठी लिहिली. त्या चिठ्ठीमध्ये त्याने वनिताने चिठ्ठी लिहिली असे दाखवित असे लिहिले की, माझ्या प्रियकराने मला येथे लग्नाचे अमिष दाखवून आणून माझ्याबरोबर शरीर सुख घेतले आहे.माझ्या जीवाचे बरे वाईट झाल्यास माझ्या प्रियकरला जबाबदार धरावे असे लिहून ती चिठ्ठी त्याने तिच्या पर्स मध्ये टाकली आणि रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत तेथून त्याने पळ काढला. दुसऱ्या दिवशी म्हणजे ४ जानेवरीला कराड पोलीसांना ऊसाच्या शेतात एका महिलेचा मृतदेह मिळून आला. पोलीस या घटनेचा पंचनामा करीत असताना त्याना त्या महिलेच्या पर्समध्ये एका तरूणाच्या आधार कार्डची झेरॉक्स आणि एक चिठ्ठी मिळून आली. त्यातील मजकुरावरून पोलीसांनी या महिलेचा खून हा अनैतिक संबंधातून झाला असल्याचे गृहीत धरून तपासाला सुरूवात केली. घटनास्थळाचा पंचनामा करून मयत महिलेची ओळख पोलीसांनी पटवली. तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कराड येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. मयत वनिता सांळुखे हिच्या जवळ सापडलेल्या चिठ्ठीवरून व आधार कार्डच्या झेराक्स वरील नावावरून पोलीसांनी संशयावरून एकाला ताब्यात घेतले. त्याचेकडे पोलीसांनी चौकशी केली असता त्याचा या घटनेशी कोणताच संबंध नसल्याचे पोलीसांना आढळून आले. त्या व्यक्तीने मयत महिलेला ओळखले असल्याने त्याने त्या मयत महिलेचे अनैतिक संबंध आपला मेहुणा येरवळे येथील शरद हणमंत ताटे याच्याशी असल्याची माहिती पोलीसांना दिली.या घटनेचा तपास कराड पोलीसाबरोबर सातरा स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करत होते. घटनेनंतर शरद ताटे हा फरार झाला होता. त्याच्या माहितीसाठी पोलीसांनी आपल्या खास खबऱ्यांना कामाला लावले होते. त्यांनी दिलेल्या माहितीवरून स्थानिक गुन्हे अन्वेणच्या पोलीसांनी एका ठिकाणी लपून बसलेल्या शरद ताटेला उचलले होते. त्याचेकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्याने आपणच आपली प्रियेसी वनिता सांळुखे हिचा गळा आवळून व तिच्या डोक्यात दगड घालून खून केल्याची कबुली दिली. आपल्या बहिणीला आपला दाजी त्रास देत असल्याने त्याला या गुन्हयात अडकविणेसाठी म्हणून त्याच्या नावचे आधारकार्डचे झेरॉक्स व एक चिठ्ठी लिहून ती वनिताच्या पर्समध्ये टाकल्याचे ही त्याने कबुल केले. या घटनेची कराड पोलीसात फिर्याद मयत वनिता सांळुखे हिचे वडिल आत्मराम सांळुखे यांनी दिल्याने पोलीसांनी वनिता आत्माराम सांळुखे (३०) हिचा गळा आवळून डोक्यात दगड घालून खून केल्या प्रकरणी तिचा प्रियकर शरद हणमंत ताटे (३३) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्याला कराड येथील मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास कराड ग्रामीण  पोलीस करीत आहेत.

### दारूच्या नशेत फुशारकी अंगाशी...

गिरणी कामगार होती. गिरणीत कामाला जाऊन ती वाल्मीकाचे पालन पोषण करत होती. वाल्मिक दिवसेंदिवस मोठा होत गेला. अशिक्षित वाल्मिकला कमी अधिक प्रमाणात शहाणपण आल्यानंतर त्याने देखील लवकरच मोलमजुरी करण्यास सुरुवात केली. कारखान्यात मशीनवर काम करुन त्याने आपल्या आईला आर्थिक हातभार लावण्याची जबाबदारी घेतली होती.  जळगाव जिल्ह्याशी वाल्मिक व त्याच्या आईची नाळ जुळलेली होती. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा हे वाल्मिकच्या आईचे माहेर तर जळगाव हे त्याच्या काकांचे गाव होते. त्यानिमित्ताने अधूनमधून जळगाव आणि पाचोरा येथे वाल्मिक व त्याच्या आईचे येणे जाणे सुरु होते. बालपणापासून मोलमजुरी करत मोठा झालेल्या अशिक्षित वाल्मिकला देशी विदेशी मद्यप्राशन करण्याची आवड होती. वाल्मिकची आई गिरणीत कामाला जात होती. त्याठिकाणी अशोक यादव नावाचा उत्तर भारतीय कामगार होता. सन २०१३ मध्ये आपल्या बोलीबच्चनच्या आधारे अशोक यादव याने वाल्मिकच्या आईवर आपले प्रेमाचे जाळे फेकले. त्या जाळ्यात स्वभावाने गरीब असलेली वाल्मिकची आई पुरती फसली. वाल्मिक व त्यांची आई रहात असलेल्या घराजवळच गांधीनगर झोपडपट्टीत अशोक रहात होता. स्वभावाने तापट असलेला अशोक यादव वाल्मिकच्या आईवर रुबाब करत असे. त्याची आई त्याला घाबरली म्हणजे वाल्मिक देखील त्याला वचकून रहात होता. गिरणीत कामावर गेल्यानंतर तो तिला कुणाशी बोलू देत नव्हता. तो तिच्यावर वर्चस्व गाजवण्याची एकही संधी सोडत नव्हता. ती कुणा परक्या व्यक्तीसोबत बोलली म्हणजे अशोक तिच्या चारित्र्यावर संशय घेत असे. समजावण्यास गेल्यावर तो वाल्मिकच्या आईवर भलता रुबाब करत असे. त्यामुळे वाल्मिक व त्यांची आई दोघे मायलेक त्याला घाबरुन दिवस काढत होते. त्यामुळे वाल्मिकच्या मनात अशोक यादव याच्याविषयी तिरस्कार निर्माण झाला होता.  अशोक आपल्या कब्जात नेहमी एक चाकू बाळगत असे. त्या चाकूच्या धाकावर तो वाल्मिकसह त्याच्या आईला धाकात ठेवत होता. तसेच भर रस्त्यात त्याच्या आईची छेड देखील काढत होता. अशोकच्या या रोजच्या त्रासाला वैतागून अशोकचा गेम करण्याचे वाल्मिकने मनाशी ठरवले. मद्याचा शौकीन असलेला वाल्मिक मधुशाळेत अर्थात दारुच्या गुत्त्यावर बिनचूक हजेरी लावत असे. त्यामुळे त्याच्यासारख्या काही नियमित मद्य खरेदीदारांसोबत त्यांचा परिचय झाला होता. पिंटू व राजू टकल्या हे दोघे मद्य खरेदी करणारे नियमित ग्राहक होते. पिंटू व राजू टकल्या हे दोघे काय करतात, कुठे राहतात याबाबत वाल्मिकला माहिती नव्हती. मात्र मधुशाळेत अर्थात दारुच्या दुकानावर त्यांची नेहमी भेट होत असे. त्यातून दोघे त्याचे मित्र झाले होते. अशोकच्या त्रासाबद्दल वाल्मिकने या दोघांजवळ आपली व्यथा कथन केली. अशोकला या जगातून कायमचे नाहीसे करायचे असल्याचे वाल्मिकने या दोघांजवळ बोलून दाखवले. याकामी त्याने दोघांजवळ मदत मागितली. सन २०१४ चा तो काळ होता. या कालावधीत वाल्मिकने दोघा मद्यप्रेमी मित्रांना जवळ केले. त्यांच्याशी जवळीक निर्माण केली. दोघांना चांगले खाण्यापिण्यास दिले. जब मिल बैठेंगे तीन यार असे म्हणत तिघे मित्र सोबतच मद्यपानाचा आस्वाद लुटू लागले. मद्याची झिंग चढल्यानंतर अशोक यादवचा खात्मा करण्याची बुद्धी त्यांना प्राप्त झाली. ठरल्यानुसार पिंटू व राजू टकल्या या दोघांनी अशोक सोबत दोस्ती केली. हळूच त्यांच्यात वाल्मिकने शिरकाव करत चौथा सदस्य होण्याचा मान पटकावला. वरुन चांडाळ चोकडी असल्याचे चौघे दाखवत असले तरी वाल्मिकसह पिंटू व राजू टकल्या यांचे त्रिकुट होते. अशोक हा त्यांच्यात उपरा होता. त्याला संपवण्यासाठी हे तिघे एकत्र आले होते. वाल्मिक आता अशोकसोबत गोडी गुलाबीने रहात होता. तो अशोकाला देखील चांगले खाऊ पिऊ घालत होता. त्यामुळे अशोकच्या उर्मटपणाची तीव्रता आता बरीच कमी झाली होती. जळगाव जिल्ह्यात मौजमस्ती करण्याच्या उद्देशाने अशोकला घेऊन जायचे व तेथेच त्याचा गेम करायचा असे वाल्मिक व त्याच्या दोघा साथीदारांनी ठरवले होते. याकामी वाल्मिकने दोघा साथीदारांना पाच हजार रुपये आगावू दिले होते. ठरल्यानुसार अशोकला अमळनेर येथे सोबत येण्यास तिघांनी तयार केले. १७ मे २०१४ रोजी मौजमस्ती करण्यासाठी चौघे जण सुरत येथून रेल्वेने अमळनेर येथे येण्यास निघाले. दुसऱ्या दिवशी १८ मे च्या सकाळी चौघे जण अमळनेर रेल्वे स्टेशनवर उतरले. फ्रेश झाल्यानंतर चौघांनी नाश्ता, चहा पाणी आदी कार्यक्रम आटोपला. अमळनेर येथील वेश्या वस्तीत चौघांनी भ्रमण करत नेत्रसुखाचा आनंद लुटला. वेश्यावस्तीत भटकंती करत नेत्रसुखाचा आस्वाद घेतल्यानंतर त्यांनी मद्याचा आस्वाद घेण्याचे ठरवले. एका दुकानातून त्यांनी मद्याची एक बाटली खरेदी केली. त्यानंतर चौघे जण पायी पायी चालत बोरी नदीच्या मार्गे धरणगाव शहराच्या दिशेने निघाले. काही अंतर पुढे गेल्यावर त्यांना एका मंदिराजवळ घनदाट झाडी दिसून आली. या झाडा झुडुपांच्या आडोशाला बसून मद्यप्राशन करण्याचा त्यांनी विचार केला. झाडा झुडूपात नाल्याकाठी चौघांनी आपला मद्यप्राशनाचा कार्यक्रम सुरु केला. ठरल्यानुसार तिघांनी अशोक यास मद्याचा डोस जास्त दिला. अशोकवर मद्याचा अंमल होताच त्याला झिंग चढली. तो मद्याच्या आहारी गेल्याचे लक्षात आल्यानंतर वाल्मिकने त्याच्याजवळ तो त्याच्या आई व बहिणीची छेड काढत असल्याचा विषय छेडला. या मुद्द्यावर वादाला सुरुवात झाली. शब्दामागे शब्द वाढत गेल्यानंतर तिघे मित्र अशोकवर हल्ला करण्यास एकवटले.  तिघांनी त्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. जवळच पडलेले मोठे दगड हातात घेत तिघांनी त्याला चेह–यावर आणि डोक्यावर मारण्यास सुरुवात केली. मद्याच्या नशेत असलेल्या अशोकचा चेहरा दगडांनी ठेचून विद्रूप करण्यात आला. त्याची ओळख पटू नये या उद्देशाने त्याचा चेहरा विद्रूप करण्यात आला व त्याला ठार करण्यात आले. तेथून जवळच असलेल्या मंगळ ग्रह मंदिराजवळ आल्यानंतर तिघांनी रिक्षाने रेल्वे स्टेशन गाठले. आल्यावर त्यांना सुरत येथे जाणारी रेल्वे मिळाली. तिघांनी त्या रेल्वेत बसून सुरत गाठले. सुरतला आल्यानंतर तिघे आपल्या आपल्या उद्योगाला लागले व दैनंदिन जीवन जगू लागले. त्यानंतर दोन दिवसांनी वाल्मिकाने दोघांना पाच हजाराची धनराशी दिली. त्यानंतर पिंटू व राजू टकल्या हे दोघे जण अशोक यास कधी भेटले नाही. दोघांसोबत वाल्मिकची ती अखेरची भेट ठरली. अशोक यादवचा कायमचा नायनाट केल्याचे वाल्मिकने त्याच्या आईच्या कानावर तिच्या माहितीसाठी आवर्जुन सांगितले. दुसऱ्या दिवशी १८ मे २०१४ रोजी अमळनेर येथील मंगळ ग्रह मंदिर परिसरात एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळल्याची वार्ता परिसरात पसरण्यास वेळ लागला नाही. या घटनेप्रकरणी अमळनेर पोलीस स्टेशनला अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. हे.कॉ. अशोक वामन मोरे यांनी सरकारतर्फे फिर्यादी होत या घटनेप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ६२/२०१४ भा.द.वि. ३०२, २०१ नुसार दाखल करण्यात आला. मयत अशोक यादव हा सर्वाच्या दृष्टीने अनोळखी होता. त्यामुळे त्यांची ओळख पटू शकली नाही. पोलीस तपासात देखील त्यांची ओळख पटली नाही व मारेकरी आपले दैनंदिन कामकाज करत राहिले. या घटनेनंतर दिवसामागून दिवस जात होते. भिंतीवरील दिनदर्शिकेच्या तारखा बदलत होत्या. बघता बघता सन २०१४ ते २०२२ असा आठ वर्षाचा कालावधी उलटला. अशोक यादवचे मारेकरी आपल्या रोजच्या कामात व्यस्त झाले. त्यांच्यापर्यंत पोलीस पोहोचू शकले नाही. पिंटू व राजू टकल्या हे दोघे कुठे गेले, ते कुठे राहतात याचा वाल्मिकला देखील थांगपत्ता नव्हता. वाल्मिक व त्यांची आई हे दोघे मायलेक सुरतला रहात होते. वाल्मिक देखील त्याचा मद्यपानाचा डोस नियमितपणे घेत होता. एकंदरीत सर्व काही सुरळीत सुरु होते. मात्र सत्य लपत नाही असे म्हटले जाते. सत्य एके दिवशी बाहेर आल्याशिवाय रहात नाही. या घटनेच्या आठ वर्षानंतर २७ डिसेंबर २०२२ रोजी नेहमीप्रमाणे सायंकाळी वाल्मिक मद्यपान करण्यासाठी देशी दारु अड्ड्यावर गेला. मद्यपान करतांना त्याचा तेथील दोघा जणांसोबत वाद झाला. शब्दामागे शब्द वाढत गेला. मद्याचे घोट रिचवल्यानंतर वाल्मिकच्या अंगात व शब्दात बळ आले होते. दोघांवर रुबाब करण्यासह त्यांना दम देण्यासाठी वाल्मिकने जोरात बोलण्यास सुरुवात केली. माझ्या कुणी नदी लागू नका, आपण जळगाव जिल्ह्यात अमळनेर येथे मर्डर केला आहे. आजपर्यंत पोलीस आपल्याला पकडू शकले नाही व पकडणार देखील नाही. असे तो मोठमोठ्याने ओरडून सांगू लागला. त्याचे वाक्य कुणीतरी सुज्ञ नागरिकाने ऐकले. त्या सुज्ञ नागरिकाने हा प्रकार सुरत क्राईम ब्रँचला कळवला. सुरत येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तातडीने त्याला ताब्यात घेतले.  त्यांची नशा उतरेपर्यंत त्याला विचारपूस केली. अखेर सुरत क्राईम ब्रँच पोलिसांनी त्याला बोलते केले. आठ वर्षापूर्वी केलेल्या खूनाची कबुली त्याने दिली.  त्याच्या माहितीनुसार डिसीजी क्राईम ब्रँच सुरत येथील पोलीस उप निरीक्षक पी.एम. वाला यांनी जळगाव जिल्ह्यातील अमळनेर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांच्याशी संपर्क साधला. आठ वर्षाच्या कालावधीत उघड न झालेला खूनाचा गुन्हा दाखल आहे काय? या बाबत त्यांनी विचारणा केली. याबाबत पो.नि. जयपाल हिरे यांनी त्यांचे सहकारी हे.कॉ. संदीप धनगर यांच्या मदतीने गेल्या आठ वर्षाच्या कालावधीतील उघड न झालेल्या खूनाच्या गुन्ह्याची जंत्री उघडली. त्यात १८ मे २०१४ रोजी दाखल असलेला गुन्हा त्यांच्या नजरेसमोर चमकला. सुरत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून सांगण्यात आलेले वर्णन या गुन्ह्यासोबत अगदी जुळून आले. पो.नि. जयपाल हिरे यांनी तातडीने सुरत एलसीबीसोबत बोलणे करत या गुन्ह्याची चर्चा केली व गुन्हा दाखल असल्याचे सांगितले. तुमचा आरोपी आमच्या ताब्यात असल्याचे पलीकडून अमळनेरचे पो.नि. जयपाल हिरे यांना सांगण्यात आले. लागलीच पुढील टप्प्यात पो.नि. जयपाल हिरे यांनी आपले सहकारी स.पो.नि. राकेशसिंग परदेशी यांना सुरत येथे रवाना होण्यास सांगितले. वाल्मिक चौधरी हा जळगाव जिल्ह्यातील मुळ रहिवासी होता. कामधंद्यानिमित्त तो बालपणापासून सुरत येथे रहात होता. त्याला गुजराती व खानदेशातील अहिराणी या दोन्ही भाषा अवगत होत्या. त्यामुळे त्याला अहिराणी भाषेत विचारपूस करुन खरा प्रकार उघड करण्यात आला. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणारा वाल्मिक नंतर खरे बोलू लागला. मयत अशोक रामलाल यादव (३५) ग्राम–बगेरु, थाना–बगेरु, जि. बांदा, राज्य– उत्तर प्रदेश हा वाल्मिकची आई काम करत असलेल्या कंपनीत काम करत होता. अनैतिक संबंध ठेवण्यासाठी अशोक यादव हा वाल्मिकच्या आईवर दडपण टाकत होता. तो वाल्मिक व त्यांची आई या दोघांना त्रास देत असे. आई व बहिणीची छेडखानी करत असल्यामुळे वाल्मिकच्या मनात अशोक बद्दल राग होता. त्यामुळे वाल्मिकने पिंटू व राजू टकल्या यांच्या मदतीने अशोक यादवची अमळनेर येथे हत्या केली. तब्बल आठ वर्षानंतर या हत्येचा उलगडा झाला. दारुच्या नशेत आपण खून केला असल्याचे तो बरळला व पोलिसांच्या तावडीत अडकला. आठ वर्षानी त्याला पोलीस कोठडीत जाण्याची वेळ आली. पोलीस अधीक्षक डॉ. प्रविण मुंढे, चाळीसगाव परिमंडळ अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, अमळनेर उप विभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश रावल यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. जयपाल हिरे व त्यांचे सहकारी सपोनि राकेशसिंह परदेशी यांनी या तपासाला गती दिली. त्यांना पोलीस अंमलदार संदीप धनगर, पो.ना.शरद पाटील, दिपक माळी, रविंद्र पाटील, सिध्दांत सिसोदे व राहूल चव्हाण यांचे सहकार्य लाभले.

# सर्वसामान्यांचे आधारवड व्हा; पोलीस दलाची शान वाढवा -अजित पवार

## भारतीय पोलीस सेवेतील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी घेतली उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट



**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या पोलीस दलाला त्यागाची, बलिदानाची, शौर्याची परंपरा आहे. महाराष्ट्र पोलीस दल जागतिक पातळीवर लौकिक प्राप्त झालेले पोलीस दल आहे. या पोलीस दलाचा राज्यातील प्रत्येक नागरिकाला अभिमान आहे. अशा महाराष्ट्र पोलीस दलात सेवा करण्याची आपणास मोठी संधी मिळाली आहे. या संधीचे सोने करत सर्वसामान्यांचे आपण आधारवड व्हा, पोलीस दलाची शान वाढवा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भारतीय पोलीस सेवेतील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना केले. मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भारतीय पोलीस सेवेतील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी भेट घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्याशी संवाद साधला. याप्रसंगी परिविक्षाधीन अधिकारी अभयसिंह देशमुख (प्रशिक्षण जिल्हा लातूर), गोकुल राज (प्रशिक्षण जिल्हा कोल्हापूर), अशीत कांबळे (प्रशिक्षण जिल्हा जळगाव), महक स्वामी (प्रशिक्षण जिल्हा वाशीम), रश्मिथा राव निथीपुडी (प्रशिक्षण जिल्हा बीड), पंकज अतुलकर (प्रशिक्षण जिल्हा औरंगाबाद ग्रामीण), ऋषीकेश रेड्डी सिंगा रेड्डी (प्रशिक्षण जिल्हा रत्नागिरी), तेगबीर सिंह संधू (प्रशिक्षण जिल्हा पुणे ग्रामीण), एम.व्ही. सत्या साई कार्तिक (प्रशिक्षण जिल्हा सोलापूर ग्रामीण), शफकत अम्ना (प्रशिक्षण जिल्हा वर्धा) उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पोलीस दलातील अधिकारी म्हणून सर्वसामान्य जनतेला तुमचा आधार वाटला पाहिजे. आपला माणूस' अशी तुमची समाजात प्रतिमा असली पाहिजे. नोकरी करताना तुम्ही जिथे कुठे असाल तिथे तुमच्या कार्यालयात येणाऱ्या माता, भगिनींना सन्मानाची वागणूक द्या. त्यांचे प्रश्न समजून घ्या. शाळकरी, महाविद्यालयीन मुलींना कोणी त्रास देत असेल तर त्यांचा बंदोबस्त करा.

महाराष्ट्राचा वारसा, इतिहास, सामाजिक लढे, चळवळी, परंपरा आपण समजून घ्या. महाराष्ट्र पोलीस दलाची शान वाढवण्याची, प्रतिष्ठा जपण्याची, प्रतिमा उंचावण्यासाठी कार्यरत राहून महाराष्ट्र पोलीस दलाचे वैभव समृद्ध करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

# महेश मांजरेकराविरुद्ध लातुरात तक्रार दाखल; शुक्रवारी महिलांची निदर्शने!



**लातूर/प्रतिनिधी**

दिग्दर्शक महेश मांजरेकर, निर्माते नरेंद्र हिरावत व श्रेयस हिरावत, सह निर्माता विजय शिंदे, एन. एच. स्टुडिओ, नाईनटी नाईन प्रोडक्शन व 'नाय वरण-भात लोंचा कोन नाय कोंचा' च्या अन्य संबंधित व्यक्ती यांच्यावर पॉक्सो कलम १३, भारतीय दंड संहिता कलम २९२ व महिलांचे बिभत्स प्रदर्शन कायदा कलम २ (c) अंतर्गत गुन्हा नोंदविण्याची मागणी भारतीय स्त्री शक्ती संघटनेने लातूरच्या गांधी चौक पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत केली आहे. त्या समाजविघातक सिनेमाचे प्रदर्शन होऊ नये यासाठी शुक्रवारी सकाळी ११ वाजता पी व्ही आर थिएटर समोर भारतीय स्त्री शक्ती संघटना, इंडियन मेडिकल असोसिएशन आणि इतर सामाजिक संघटनेच्या वतीने निदर्शने करण्यात येणार आहेत. हा चित्रपट अठरा वर्षाच्या पुढील लोकांसाठी असला तरी यामध्ये ज्या प्रकारे बालकांचा वापर केलेला आहे तो लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण २०१२ (POCSO) या कायद्याअंतर्गत गुन्हा असून अशाप्रकारे ट्रेलर व चित्रपट बनवून बालकांचा चुकीचा वापर करून आरोपी त्याद्वारे अर्थार्जन करीत आहेत. तरी एन. एच. स्टुडिओ, नाईनटी नाईन प्रोडक्शन, दिग्दर्शक महेश मांजरेकर, निर्माते नरेंद्र हिरावत व श्रेयस हिरावत, सह निर्माता विजय शिंदे व 'नाय वरण-भात लोंचा कोन नाय कोंचा' च्या अन्य संबंधित व्यक्ती वर लैंगिक शोषणापासून बालकांचे संरक्षण २०१२ (POCSO) कलम १३,१४,१५ r/w ८, १२ भारतीय दंड संहिता कलम २९२ r/w ३४ व महिलांचे बिभत्स प्रदर्शन कायदा कलम २ (c) या कायद्याअंतर्गत व अन्य संबंधित कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

# भिवंडीत पुन्हा कोरोनाचा सामना करण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज



**भिवंडी/आकाश गायकवाड**

कोरोनाच्या पहिल्या लाटे पासून आरोग्य विभागा सोबतच लॉकडाऊनची कडक अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस यंत्रणा रस्त्यावर चोवीस तास तैनात होती. तीच परिस्थिती पुन्हा कोरोनाच्या तिसऱ्या लाटेत उदभवत असून त्यामुळे पोलीस विभाग पुन्हा एकदा कामाला लागले असून भिवंडी तालुक्यातील कोनगाव वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीश गोडे यांनी पुढाकार घेत आपल्या सहकारी पोलीस कर्मचाऱ्यांची सर्वप्रथम काळजी घेत त्यांचा सर्वसामान्यां नागरीकांशी जास्त संपर्क येत असल्याने वाहतूक पोलिसांना सॅनिटायझर मास्कचे वाटप करीत नागरिकांमध्ये जेव्हा वावरतात तेव्हा तुम्ही देखील तुमची काळजी घेत राहा तसेच वाहन चालकांना देखील मास्क चे वाटप करून जनजागृती करून, रिक्षामध्ये जेव्हा तुम्ही बसतात तेव्हा सोशल डिस्टंसिंग ठेवून आणि रिक्षामध्ये जेव्हा बसतात तेव्हा मास्क लावून बसणे, सोशल डिस्टंसिंग ठेवणे रिक्षाचालकाच्या पाठीमागे प्लास्टिकचे कव्हर लावून ठेवणे जेणेकरून कोरोनाचा फैलाव होणार नाही दोन चाकी व चार चाकी वाहन चालकांना अशा सर्व नागरिकांना वाहतूक पोलिसांकडून सूचना करण्यात आल्या आहेत.

# शादुल बौडीवाले वलांडीकर यांना साहित्य सारथी कलारत्न पुरस्कार प्रदान



**देवणी/प्रतिनिधी**

साहित्य आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना साहित्य सारथी कला मंच या संस्थे मार्फत दिला जाणारा सन २०२२ चा साहित्य सारथी कला रत्न पुरस्कार वलांडी ता.देवणी येथील युवा दिग्दर्शक तथा चित्रपट निर्माते शादुल बौडीवाले यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शादुल बौडीवाले यांनी आतापर्यंत एका मोठया पडद्यावरील मराठी चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केली आहे. भौतिक सुविधेअभावी होणारी शिक्षण व्यवस्थेची परवड समर्थपणे मांडणाऱ्या एका पुरस्कार प्राप्त लघुपटाची निर्मिती केली असून त्याच बरोबर एका विनोदी लघुपटाचीही निर्मिती केली आहे. या पुढेही समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित घटकांचे प्रश्न लघुपटाच्या माध्यमातून सक्षमपणे मांडण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. लातूर येथे झालेल्या कार्यक्रमात लातूरचे ज्येष्ठ विचारावंत तथा साहित्यिक प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार, कवी आणि वात्रटिकाकार भारत सातपुते, अकोला येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ.किरण वाघमारे, हास्य अभिनेते बालाजी सूळ, ज्येष्ठ इतिहासकार विवेक सौताडेकर, यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी प्रहार शिक्षक सभेचे प्रदेशाध्यक्ष कालिदास माने, राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त उमेशजी खोसे, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस ऍड. क्स गोमसाळे, आनंद गीते, जालिंदर बरडे, दत्तात्रय परळकर, डिगोळे सर, प्रेमकवी सुरेश धोत्रे इत्यादी उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल सामाजिक, राजकीय, साहित्य आणि विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींनी शादुल बौडीवाले यांचे अभिनंदन केले आहे.

# सिध्देश्वर रत्नेश्वर मंदिर मार्ग असे नामकरण

लातूर : लातूर शहर महानगरपालिकेच्यावतीने गजराज चौकातील साळे गल्ली परिसरातील साठफुटी रोडला श्री.सिध्देश्वर रत्नेश्वर मंदिर मार्ग असे नाव देण्याचा निर्णय २४ सप्टेबर २०२१ रोजी घेण्यात आला असून फलक लावणे व कमान उभारणीबाबतचा स्थायी समिती ठराव क्र.१९९ अन्वये एकमताने पारीत झाला असून या फलकाचे अनावरण नुकतेच स्थायी समितीचे सभापती दीपक मठपती यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा युवा मोर्च्याचे शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक अजितसिंह पाटील कव्हेकर, साळे गल्लीतील हनुमान मंदिर ट्रस्टचे सदस्य सूरेश गोजमगुंडे, सोमनाथ अप्पा शिवनगे, ज्ञानदेव येलगटे, राजू गुंजोटे, राजू चापोलीकर, लक्ष्मण मिरकले, अशोक कंटेकर, राजू मोगले, विर योध्दाचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत रांजणकर, बालाजी पिंपळे, नरेश खराटे, दीपक येलगट्टे, व्यंकट मोगले, संतोष भावे, बाळू नरहारे, मुन्ना चामले, नामदेव शिंदे यांच्यासह मान्यवर मंडळीची उपस्थिती होती. दरम्यान साळे गल्ली भागातील साठफुटी रोडला श्री.सिध्देश्वर रत्नेश्वर मंदिर मार्ग हे नाव देण्यात आले. या नामकरण फलकाचे अनावरण नुकतेच करण्यात आले असून याबाबतच्या कमानीचे देखील काम प्रगतीपथावर करून घेऊ असा विश्वास स्थायी समितीचे सभापती दीपक मठपती यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

# डॉ.हनुमंत धर्माकारे यांच्या हत्येची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी




**अहमदपूर/फिरोज शेख**

उमरखेड शहरातील प्रसिध्द बालरोगतज्ज्ञ डॉ. हनुमंत धर्माकारे यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करावी. या घटनेची सखोल उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी अशी मागणी येथील क्रांतिवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ (लसाकम) यांनी केली आहे. तहसीलदार अहमदपूर मार्फत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना या आशयाचे निवेदन दिले असून त्यात म्हटले आहे की, डॉ.हनुमंत धर्माकारे हे उमरखेड शहरातील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. बालरोगतज्ज्ञ असलेले डॉ.धर्माकारे हे अतिशय कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. ११ जानेवारी रोजी सायंकाळी ४३० वाजता अज्ञात मारेकऱ्यांनी गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. सदर घटना घडून तीन, चार दिवस झाले आहेत तरी उद्याप पोलीसांनी आरोपींना अटक केली नाही. आरोपींना तात्काळ अटक करून या घटनेची उच्चस्तरीय सखोल चौकशी करून दोषींविरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. या निवेदनावर समाज कल्याणचे माजी सभापती ॲड.टि.एन कांबळे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार प्राप्त उत्तमराव माने, जेष्ठ विधिज्ञ ॲड.आर.एस.वाघमारे, लसाकमचे मार्गदर्शक प्रा.दिलीप भालेराव, जिल्हा प्रवक्ते नरसिंग सांगवीकर, तालुकाध्यक्ष राजकुमार गोंटे, कार्याध्यक्ष विश्वांभर जिवारे, उपाध्यक्ष शिवाजीराव कांबळे,तालुका संघटक नामदेव अर्जुने, रोहन माने आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# शातीर चोरटा पोलिसांच्या जाळ्यात; सात दुचाकी जप्त



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**


विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने एका संशयित तरुणास अटक केली असून त्याच्याकडून पावणेचार लाखांचा चोरीच्या सात मोटारसायकली जप्त करण्यात आले आहेत. नितीन उर्फ निखिल मारुती कांबळे (३२) असे अटक केलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. गेल्या काही दिवसापासून शहरांमध्ये मोटरसायकली चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहेत. याबाबत सोलापूर शहर पोलीस उपायुक्त डॉ.वैशाली कडूकर यांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारावर प्रतिबंधात्मक कारवाई करून चोरी उघडकीस आणण्याचे आदेश पोलिसांना दिले होते. त्याप्रमाणे विजापूर नाका पोलीस ठाणे हद्दीतील रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा शोध घेत असताना पोलिसांना एक मोटारसायकल चोरी करणारा तरुण आसरा चौकात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तो आला असता डीबी पथकाने त्याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली. त्यावेळी त्याने शहरातून विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत २, सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ३, एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून १ अशा एकूण ७ मोटरसायकलची चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून २ हिरो एचएफ डीलक्स, २ हिरो होंडा पॅशन, १ होंडा शाईन अशा ३ लाख ७० हजारांच्या ७ दुचाकी हस्तगत केल्या आहेत. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त हरीश बैजल, पोलीस उपायुक्त डॉ.वैशाली कडूकर, सहाय्यक पोलीस आयुक्त माधव रेड्डी, पोलीस निरीक्षक बाळकृष्ण हनपुढे पाटील, अजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे फौजदार सिद्धेश्वर मुरकुटे तसेच पोलीस कर्मचारी मोरे, राजकुमार तोळणूरे, श्रीरंग खांडेकर, शिवानंद भीमदे, अंबादास गडम यांनी केली.

# लाच मागणाऱ्या तलाठ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर/प्रतिनिधी**

वहिवाटीचा रस्ता खुला करुन मिळण्याकरिता तहसिलदाराकडे सादर केलेल्या अर्जावर सुनावणी होऊन निकाल आपल्या बाजूने लावण्यासाठी २० हजारांच्या लाचेची मागणी करणाऱ्या तलाठयाविरुद्ध सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे. समाधान बाळासाहेब काळे (३३) असे गुन्हा दाखल झालेल्या तलाठ्याचे नाव आहे. अक्कलकोट तालुक्यातील अंकलगी येथे तक्रारदाराची शेत जमीन असून शेतमालाची ने-आण करण्याकरिता वहिवाटीचा रस्ता खुला करून मिळण्याकरिता तहसीलदार यांच्याकडे अर्ज सादर करण्यात आला होता. या अर्जावर सुनावणी होऊन वरिष्ठांकडून तक्रारदाराच्या बाजूने निकाल लावून निकालाची प्रत देण्याकरिता तलाठी काळे यांनी एकूण पंचवीस हजाराच्या लाचेची मागणी केली. त्यातील पहिला हप्ता म्हणून वीस हजार रुपये मागणी केली होती. दरम्यान तक्रारदाराने सोलापूर लाचलुचपत विभागाकडे सदर तलाठी काळे यांच्या विरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई सोलापूर लाचलुचपत विभागाचे अधीक्षक राजेश बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक संजीव पाटील यांच्या पथकाने केली.

## थोडक्यात वृत्तांत



### राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्याजयंतीनिमित्त उपमुख्यमंत्र्यांचे अभिवादन!

मुंबई : राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. राष्ट्रासाठी त्यागाची आणि जगण्याची प्रेरणा असणाऱ्या राजमाता जिजाऊ आणि जगभरातील युवकांना जगण्याचा आणि जिंकण्याचा मूलमंत्र देणारे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात आज कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर, सामान्य प्रशासन विभागाच्या सचिव इंद्रा मालो यांनीही यावेळी पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव ज.जी.वळवी, अवर सचिव विठ्ठल भास्कर यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी यांनीही पुष्प अर्पण करून वंदन केले.

### कोकण विभागीय लोकशाही दिनी २० अर्ज निकाली

नवी मुंबई : कोंकण विभागीय लोकशाही दिन आज कोंकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली. यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या ३६ असून आज आलेल्या अर्जांची संख्या ०८ असे एकूण प्राप्त अर्ज ४४ होते. त्यापैकी आज २० अर्ज निकाली काढण्यात आले. आज रोजी २४ तक्रारी प्रलंबित आहेत. लोकशाही दिनाच्या पार्श्वभूमीवर कोरोना प्रतिबंधक उपाय योजना करण्यात आल्या होत्या.

### १७ जानेवारी रोजी महिला लोकशाही दिन

पालघर : महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास शासन विभाग निर्णयाअन्वये जिल्हा स्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी म्हणजेच या महिन्याचा महिला लोकशाही दिन हा दि. १७/१/२०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे आयोजित करण्यात येत आहे. महिला लोकशाही दिनाचा अर्ज जिल्हाधिकारी यांना उद्देशून असावा. तालुका महिला लोकशाही दिन टोकन क्रमांक व तहसीलदार यांच्या उत्तराची प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवसाच्या अगोदर अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, मातोश्री बंगला, आर्यन ग्राउंड च्या शेजारी, विष्णू नगर रोड, लोकमान्य पाडा, पालघर ई मेल- dwcdopalghargmail.com फोन नं. ०२५२५-२५७६२२ यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह सादर करावा. असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर यांनी केले आहे.

### लातूर व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड

लातूर : इन्स्टिट्युट ऑफ चार्टड अकाउंटंटस ऑफ इंडिया, लातूर शाखेच्या व्यवस्थापन समितीची निवडणूक बिनविरोध पार पडली. शाखेचे विद्यमान अध्यक्ष सीए विशाल चव्हाण यांनी माहिती देताना सांगितले की,दि.१९ जानेवारी रोजी निवडणूक होणार होती.यासाठी एकूण ८ उमेदवारांचे अर्ज आले होते.दि.१३ जानेवारी रोजी उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दोघांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले.यामुळे निवडणूक बिनविरोध झाली. नूतन समितीमध्ये सीए निलेशकुमार बजाज,सीए द्वारकादास भुतडा,सीए एकनाथ धर्माधिकारी,सीए राहुल धरणे,सीए विश्र्वास जाधव आणि महेश तोष्णीवाल यांचा समावेश आहे.२०२२ ते २०२५ या कालावधीसाठी या व्यवस्थापन समितीची निवड झाली असून दि.२६ फेब्रुवारी पासून ही समिती पदभार स्वीकारेल.या निवडणुकीसाठी सीए उदय स्वामी यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पहिले. लातूर शाखेचे अध्यक्ष सीए विशाल चव्हाण,उपाध्यक्ष द्वारकादास भुतडा,सचिव विनोद साळुंके,विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष राजेश अग्रवाल व सदस्य किशोर भराडिया यांनी नुतन समितीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### जिल्हाध्यक्षपदी हनिफभाई शेख

लातूर : अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास या संघटनेच्या लातूर जिल्हाध्यक्ष पदी अहमदपूर येथील सामाजिक कार्यकर्ते तथा गेल्या २३ वर्षापासुन पद्मभूषण अण्णा हजारे यांचे विश्र्वासू हनिफभाई शेख यांची निवड करण्यात आली. राळेगण सिद्धी येथील कार्यालयातून अण्णा हजारे, संजय पठाडे,शिवाजी खेडकर, अलाओद्दीन शेख, अशोक सब्बन, बालाजी कोम्पलवार, अँड.अजित देशमुख यांनी ही निवड जाहीर केली. हनिफ शेख यांनी न्यासचे जिल्हा संघटक म्हणून दोनवेळा काम पाहिलेले आहे.आता त्यांच्यावर नवी जबाबदारी देण्यात आली आहे. हनिफ शेख यांच्या निवडीबद्दल बासिदखान पठाण, बाबु शेख, बाबुअप्पा मिटकरी, खय्युम शेख, सुधीर पुरी, नामदेव कारभारी, युनूस चौधरी, महादेव भंडे, देशमाने, बालाजी गोविंदराव शिंदे आदींसह जिल्हाभरातुन कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. जनसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अण्णांनी न्यासची रचना पुर्ववत केली आहे.न्यासने मागील काळात आंदोलने करुन १२ नवे कायदे बनविण्यासाठी सरकारला भाग पाडले होते. आता लातुरात न्यासच्या माध्यमातून अण्णांच्या निर्देशानुसार पुन्हा आंदोलने करण्यात येतील, असे मत हनिफभाई शेख यांनी व्यक्त केले.

### आज जिल्हा नियोजन समितीची बैठक

पालघर : कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली पालघर जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठक सोमवार दिनांक १७ जानेवारी २०२२ रोजी दुपारी २.०० वाजता Video conference (online) द्वारे आयोजित करण्यात आली असल्याचे जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हा नियोजन समिती, पालघर यांनी कळविले आहे.

# सहनशीलता संपली!

माणूस किती जरी सोशिक असला तरी त्याच्या सहन शिलतेलही मर्यादा आहेत. त्यामुळे या मर्यादा संपल्या की माणूस कुठल्या थराला जाईल याचा नेम नाही. आज एसटी कामगारांच्या बेकायदेशीर संपामुळे ग्रामीण भागातला माणूस रडतोय. त्याचे सर्व व्यवहार बंद झालेत. मुला-बाळांचे शिक्षण बुडण्याची पाळी आलीय. पण सरकार अजूनही गप्प आहे. आक्रमक भूमिका घ्यायला तयार नाही. सरकार अक्षरशः ग्रामीण जनतेच्या सहनशीलतेची परीक्षा घेत आहे. किती दिवस लोकांनी हे सगळ सहन करायचं उद्या जर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील लोकांच्या भावनांचा उद्रेक झाला आणि ते संपकरी एसटी कामगारांवर तुटुन पडले, तर सरकार किती जणांना रोखणार आहेत. अजूनही वेळ गेलेली नाही. विलीनीकरण जर करायचेच नसेल तर साम दाम दंड निती वापरून हा संप मोडून काढा आणि ग्रामीण भागातील कोट्यवधी जनतेची त्रासातून सुटका करा. सध्या विलीनीकरणाच्या मुद्यावर सुरू असलेला एसटी कामगारांचा संप हा पूर्णपणे बेकायदेशीर आणि लोकांना खास करून ग्रामीण भागातील प्रवाशांना त्रास देणारा आहे. त्यामुळे सरकारने आता प्रवाशांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. अन्यथा प्रवासी हातात दगड घेऊन रस्त्यावर उतरतील. त्यानंतर सरकार आणि संपकरी एसटी कामगारांचे काय होईल याची कुणी कल्पनाही करू शकणार नाही. एसटी हे ग्रामीण जनतेचे प्रवासाचे एकमेव साधन आहे. पण ते बंद असल्याने जे शहरात कामाला जाणारे लोक आहेत, जे आजारी लोक आहेत, जे वयोवृध्द लोक आहेत त्यांना शहरात उपचारासाठी जाता येत नाही. रिक्षावाले या संपाचा फायदा उचलून ५०० ते १००० रुपये भाडे घेत आहेत. अशावेळी ग्रामीण भागातील लोकांनी काय करायचे. सरकारचे डोळे फुटले आहेत का? औद्योगिक न्यायालयाने संप बेकायदा ठरवला आहे. उच्च न्यायालय सुद्धा संपकरी कामगारांवर नाराज आहे. तरी सरकार संपकरी कामगारांवर बडतर्फीची कारवाई का करीत नाही? हा संप पूर्णपणे बेकायदेशीर आणि प्रवाशांसाठी अन्याय कारक असल्याने सरकारने त्यावर कठोर भूमिका घ्यायला हवी होती. पण सरकारच्या बोटचेपे धोरणामुळे संप चिघळला आहे. सदावर्ते नावाचा एक मनोरुग्ण संपकऱ्यांना भडकावतोय आणि सरकार गप्प आहे. अशावेळी प्रवाशांनी किती हाल सोसायचे. ९० हजार एसटी कर्मचाऱ्यांसाठी सरकार ४ कोटी प्रवाशांचा छळ का करतेय? लोक जर संतापले, तर काहीही घडू शकेल. मग ते घडावे आणि चिडलेल्या प्रवाशांच्या हातून संपकरी कर्मचाऱ्यांनी मार खावा असे सरकारला वाटते आहे का? जर यापुढे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारवर असेल. संपकरी कामगारांना मस्ती आली आहे. एकतर आजकाल कोणाला नोकरी मिळत नाही, अशावेळी मिळालेल्या नोकरीवर लाथ मारायची दुर्बुद्धी जर त्यांना देवानेच दिली असेल तर त्यांच्या कर्माचे ते! सरकार त्यांच्या हट्टापायी ४ कोटी प्रवाशांना वेठीस का धरते आहे? झाले तेवढे बस झाले, आता सरकारने अधिक वाट बघू नये अन्यथा प्रवासी गप्प बसणार नाहीत. अख्ख्या महाराष्ट्रात साडेबारा कोटी लोकांमध्ये एकता सदावर्तेच शहाणा आहे का? सरकार, प्रवासी जनता हे सगळे मूर्ख आहेत का? एसटी कामगारांना एवढं सुद्धा कळतं नाही का? उद्या समजा सरकारने खाजगीकरणाचा निर्णय घेतला तर काय करणार? तुम्ही तुमची मुले बाळे, तुमचा संसार रस्त्यावर येईल तेंव्हा तुमच्या मदतीला सदावर्ते येणार आहे का? कशाला स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेताय? असाच जर हट्ट धरलात तर जे गिरणी कामगारांचे झाले तेच किंवा त्याही पेक्षा तुमचे वाईट होऊ शकते. तुम्ही आम्ही तुमच्याच गावातले बिचारे लोक आपण सगळे गरीब लोक आहोत. त्यामुळे आपले जर काय वाईट झाले तर आपल्याला कुत्रा विचारणार नाही. अनिल परब, शरद पवार फडणवीस, सदाभाऊ पडळकर हे सगळे मोठे लोक आहेत, करोडपती आहेत. त्यांच्या नादाला कुठे लागता? त्यांच्याकडे गाड्या आहेत पण खेड्यातला तुमचा गरीब बांधव ज्यात तुमचे नातेवाईक सगेसोयरे आहेत त्यांना बिचाऱ्या या संपामुळे किती त्रास होतोय याचा विचार करा, त्यांचा कामधंदा गेला जे आजारी होते त्यांना दवाखान्यात जायला मिळाले नाही, त्यामुळे घरात तडफडून मेले त्यांचा विचार करा. उद्या तुमची नोकरी गेली तर सदावर्तेच्या डोळ्यात पाणी येणार नाही तर एसटीच्या संपामुळे खेड्यातला तुमचा जो गरीब नातेवाईक काम धंदा गमावून बसला आहे त्याच्या डोळ्यात पाणी येईल. कारण तो आणि तुम्ही काही वेगळे नाहीत. तुमचं आणि त्यांचं रक्तच नात आहे. तुम्ही आणि तो खेड्यातला प्रवासी एकाच गावात राहणारे आहात. एकमेकाच्या सुखदुःखात सामील होणारे आहात. उद्या गावातला एखादा संपकरी एसटी कामगार मृत्यू पावला तर त्याच्या प्रेताला सदावर्ते किंवा अनिल परब येणार नाही, तर या संपामुळे गावातल्या ज्या लोकांचा कामधंदा गेलाय ते लोक पुढे येतील, त्याच्या कुटुंबाचे अश्रू पुसणारे हात गावातल्या लोकांचे असतील. सदावर्ते, फडणविस, अनिल परब पुढे येणार नाही. तेंव्हा संपकरी बांधवांनी आपल्या गावातील लोकांचा प्रवाशांचा आणि भविष्यातील आपल्या नोकरी धंद्याचा विचार करावा एवढीच त्यांना विनंती आहे.

# क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक करताय... सावधान!

**'ये ऑनलाईन का जमाना है' म्हणत आपण सर्व व्यवहार ऑनलाईन करत आहोत. ऑनलाईन जमान्यात आर्थिक व्यवहारही मोठ्या प्रमाणात ऑनलाईनच होत आहेत. यातच ऑनलाईन व्हर्च्युअल करन्सी अर्थात क्रिप्टो करन्सीने सगळ्यांना आकर्षित केले आहे. क्रिप्टो करन्सीतील गुंतवणूक वाढत आहे. एकीकडे देशात क्रिप्टो चलन नियमन येण्याबद्दल चर्चा सुरू आहे. मात्र दुसरीकडे उत्सुकतेपोटी क्रिप्टो करन्सीत गुंतवणूक करणाऱ्यांची होतेय फसवणूक!**

## दिशायन

क्रिप्टोकरन्सी म्हणजे आभासी चलन. चलनी नोटांना पर्याय असणारी एक डिजीटल किंवा व्हर्च्युअल करन्सी होय. हे चलन भारतीय रुपया, अमेरिकन डॉलर किंवा ब्रिटीश पाँड सारखे नसून. कोणत्याही देशाचे सरकार किंवा बँक हे चलन छापत नाही. क्रिप्टोकरन्सी ही फक्त ऑनलाईन उपलब्ध असते.

**क्रिप्टोकरन्सीची पार्श्वभूमी**

डेव्हिड चॉम यांनी १९८३ साली क्रिप्टोग्राफिक इलेक्ट्रॉनिक मनी अर्थात ईकॅशची संकल्पना सर्वप्रथम मांडली. चॉम हे अमेरिकन संगणक शास्त्रज्ञ आणि क्रिप्टोग्राफर आहेत. त्यांना क्रिप्टोग्राफी आणि गोपनीयता-संरक्षण तंत्रज्ञानातील एक अग्रणी म्हणून ओळखले जाते. १९९५ साली त्यांनी क्रिप्टोकरन्सीची संकल्पना प्रत्यक्षात आणली, म्हणूनच डेव्हिड चॉम यांना डिजिटल रोखीचे शोधकर्ता आणि पितामह असे संबोधले जाते. पूर्वी क्रिप्टोकरन्सीचा वापर करण्यासाठी विशिष्ट सॉफ्टवेअरची गरज भासत असे. क्रिप्टोकरन्सीचे रुपांतर प्रत्यक्ष पैशात करण्यासाठी विशिष्ट एनक्रिप्टेड कीद्वारे बँकेतून पैसे काढण्यासाठी आणि प्राप्तकर्त्याला पाठवण्यासाठी सॉफ्टवेअरचा वापर होत असे. हे व्यवहार अगदी प्रायोगिक तत्त्वावर तुरळक प्रमाणात होत होते.

२००८ साली अज्ञात व्यक्ती किंवा व्यक्तींच्या समुहाने सातोषी नाकामोटो या नावाने क्रिप्टोकरन्सीची पहिली मुहूर्तमेढ रोवली. या चलनाचा वापर मात्र २००९ पासून सुरू झाला. पहिल्या क्रिप्टोकरन्सीचा बहुमान हा बीटकॉईनला मिळतो. २०११ मध्ये क्रिप्टोकरन्सीसाठी इंटरनेट सेन्सॉरशीप आली, ज्यामुळे याची विश्वासार्हता वाढली. जून २०२१ मध्ये मध्य अमेरिकेतील एल् साल्वाडोर या देशाने संसदेत विधेयक पास करून, बीटकॉईन या क्रिप्टोकरन्सीला अधिकृतरीत्या स्वीकारले.

**क्रिप्टोकरन्सीमध्ये कशी गुंतणूक करावी?**

क्रिप्टोकरन्सी विकत घेण्यासाठी, सर्वप्रथम एक्सेंज अकाऊंट सुरू करणे करणे गरजेचे आहे. जिथे प्रत्यक्ष पैशांचे हस्तांतरण करून क्रिप्टो पैसे विकत घेता येऊ शकते. हे एक्सचेंज अकाऊंट म्हणजे वॉलेट ज्यासाठी क्रिप्चोकरन्सीचे व्यवहार करणाऱ्या ऑनलाईन ॲपची आवश्यकता असते. कॉईनबेस, जेमिनी, क्राकेन इत्यादी काही ॲपचा वापर करता येई शकतो. ॲपचा वापर करणे शक्य नसेल तर पारंपरिकरीत्या शेअर बाजाराच्या व्यवहारांसाठी दलाल किंवा एजंट म्हणून काम करणारे क्रिप्टो गुंतणुकीचीही सेवा पुरवतात, यांचीही मदत घेता येऊ शकते. क्रिप्टो एक्सचेंजमध्ये आपले प्रोफाईल अकाऊंट बनवल्यावर ठरवावे लागते की क्रिप्टो साठवण्यासाठी हॉट वॉलेट की कोल्ड वॉलेट वापरायचे ते ठरवावे लागते. हॉट वॉलेट हे इंटरनेटशी जोडलेले असते. या वॉलेटला सायबर अटॅकचा धोका संभवतो, वॉलेटमधील क्रिप्टो पैशांची चोरी होऊ शकते. परंतु हे वॉलेट जलद गतीने वापरता येते, ट्रेडिंग किंवा खर्च करण्यासाठी सोप्पे आहे. तर कोल्ड वॉलेट म्हणजे युएसबी स्टीक होय. जसा डेटा पेनड्राईव्हवर सेव्ह करतो तसेच क्रिप्टो पैसे हार्डवेअर अर्थात कोल्ड वॉलेटमध्ये साठवणे होय. मात्र याद्वारे व्यवहार करणे कठीण होऊन बसते. आपल्यासाठी हॉट, कोल्ड की दोन्ही वॉलेट अनुरुप आहेत याचा विचार करून वॉलेट निवडता येईल. मग हवे ते आणि हवे तेवढे क्रिप्टो पैसे विकत घेता येतील, मग या पैशांचे व्यवस्थापन करता येईल. म्हणजे हे पैसे किती काळासाठी ठेवायचे दीर्घ काळ की लघु काळ तसे सेट करायचे. क्रिप्टोच्या किंमतीनुसार त्याची सतत खरेदी विक्रीही करता येते. थोडक्यात



क्रिप्टोमधील गुंतवणूक ही काहिशी शेअर बाजारासारखी असते, तशाच प्रकारचे ट्रेडिंग येथेही करता येते.

**क्रिप्टोकरन्सीतील ब्लॉकचेन म्हणजे?**

मायनिंगद्वारे या करन्सीची निर्मिती होते. तर ब्लॉकचेनच्या मार्फत या करन्सीचे व्यवहार होतात. जगभरात रुपया, डॉलर, युरो, पाऊंड अशी विविधं चलनं आहेत, तसेच जगभरात वेगवेगळ्या अशा १६ हजार क्रिप्टोकरन्सी आहेत. बिटकॉईन, लाईटकॉईन, रिपल, इथेरियम आणि झेड कॅश नावाच्या काही प्रसिद्ध क्रिप्टोकरन्सी आहेत. फेसबुकही त्यांची लिब्रा नावाची क्रिप्टोकरन्सी लाँच करणार असल्याची चर्चा सध्या रंगली आहे. जसे आपल्याला बँकांमधून नोटा मिळतात तसेच इथे ऑनलाईन साईट्सवर हे चलन आपल्याकडे असलेल्या पैशातून खरेदी करता येते. ही खरेदी केल्यावर आपले एक ई-वॉलेट तयार होते, ज्यात ही करन्सी साठवता येते. अशी प्रत्येक खरेदी केल्यावर एक नवा ब्लॉक तयार होतो आणि या प्रक्रियेला माईनिंग असे म्हणतात. जितके जास्त आर्थिक व्यवहार एका ब्लॉकचेनमध्ये होतात, तितके अधिक ब्लॉक बनतात आणि तितके माईनिंग तयार होतात. सर्व प्रकारच्या क्रिप्टोकरन्सीसाठी ब्लॉकचेन हे तंत्रज्ञान वापरले जाते. ब्लॉकचेन म्हणजे रेकॉर्ड्सची लिस्ट होय. ज्यामध्ये विविध स्वरूपाची माहिती मोठ्या प्रमाणात साठवली जाते म्हणजेच रियल टाईममध्ये साठवली जाते.आणि प्रत्येक साखळीचा आपल्या आधीच्या साखळीतल्या माहितीशी संबंध असतो. ही माहिती एकदा रेकॉर्ड झाल्यानंतर बदलता येत नाही.

प्रत्येक चलन व्यवहाराची माहिती एका ब्लॉकमध्ये ठेवतात. प्रत्येक व्यवहाराचे एक - एक ब्लॉक मिळून ब्लॉकचेन तयार होते. असे अनेक ब्लॉक एकात एक ठेवल्यामुळे त्याच्यासोबत छेडछाड करता येत नाही. म्हणूनच हे व्यवहार अतिशय सुरक्षित होतात आणि ही यंत्रणा हॅक होण्याची शक्यता नगण्य असते. ऑनलाईन व्यवहारांसाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञान सगळ्यात सुरक्षित मानले जाते. शिवाय त्यामध्ये गुप्तता असते. व्यवहार फक्त दोन व्यक्ती किंवा कम्प्युटरद्वारे होतात. त्यामुळे त्यावर इतर कुणाचे नियंत्रण नसते. म्हणूनच ब्लॉकचेन व्यवहार डेमोक्रॅटिक किंवा मुक्त मानले जातात.

**तरी क्रिप्टो व्यवहार असुरक्षित का?**

क्रिप्टोकरन्सीचे व्यवहार एवढे सुरक्षित आहेत, तरी यात फसवणूक कशी होते, असा प्रश्न पडतो. २०२२ चे वर्ष उघडताच, क्रिप्टोकरन्सीचा बाराने कोटींचा घोटाळा बाहेर आला. यात ९०० नागरिकांना यात बाराशे कोटींची गुतवणूक केली होती. केरळधील ३१ वर्षीय निषादने खोटे क्रिप्टो एक्सेंज ॲप बनवले, तसेच खोटी करन्सीदेखील लिस्टींग केली. ऑनलाईन प्रमोशनच्या माध्यमातून लोकांना पैसे दुप्पट होतील, नफा होईल असे आमिष दाखवत पैसे लावायला भाग पाडले अन् लोकही मोहाला बळी पडले. घोटाळेबाजांनी गुंतवणूकदारांकडून घेतलेल्या पैशातून रिअल इस्टेटमध्ये बेकायदेशीरपणे गुंतवणूक केली. सर्वाधिक गुंतवणूक केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांमध्ये झाली. क्रिप्टो व्यवहारात विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी बड्या क्रिप्टो एक्सचेंज प्लॅटफॉर्म जसे वझीएक्स, कॉईनस्विच कुबेर, कॉईनडीसीएक्स यांनी आणि यांसारख्या इतर कंपन्यांनी २ लाखांहून अधिक फसवे अकाऊंट्स डिलिट केले आहेत. अनेक लोक खोटी माहिती देऊन व्यवहार करत होते, तर काहीजण कर बुडवण्यासाठी व्यवहार करत होते, तर काहींच्या संशयास्पद ट्रेडिंगमुळे यांचे अकाऊंट्स डिलिट करण्यात आले होते. अलिकडे प्रसिद्ध झालेल्या विविध विश्लेषणात्मक अहवालांनुसार, क्रिप्टोकरन्सी व्यवसायातील आर्थिक घोटाळ्यांची संख्या २०२१ मध्ये ५० टक्क्यांहून अधिक वाढून ३ हजार ३०० पेक्षा जास्त झाली आहे. २०२० मध्ये फसवणुकीच्या प्रकरणांची संख्या २ हजार ५२ होती. घोटाळेबाजांनी वर्षभरात जगातील ७.७ अब्जांवर डल्ला मारला. तर भारतात झालेल्या सर्वात मोठ्या क्रिप्टो घोटाळ्याच्या पद्धतीनुसार फसवणूक करण्याचा ट्रेंड सध्या सुरू आहे. खोटी क्रिप्टोकरन्सी डेव्हल्प करून, खोटे ॲप बनवून लोकांना फसवून वर्षभरात ७.७ अब्जपैकी तब्बल २.८ अब्ज रुपये याच मार्गाने मिळवले गेले आहेत. या फसवणुकीच्या प्रकाराला रॅगपूल असे संबोधले जाते.

**क्रिप्टोमध्ये गुंतवणूक करताना काय काळजी घ्यावी?**

सुरुवातील गुंतवणूक करताना मोजकीच करावी. जेणेकरून फसवणूक झालीच तर फार अडचण येणार नाही. तुम्ही गुंतवणूक करता त्याच्या १० ते १२ टक्क्यांच्यावर यात पैसे लावू नका. क्रिप्टो करन्सी ही कधीच स्थिर नसते. ७० ते ९० टक्क्यांवर पर्यत किंमतींमध्ये चढ-उतार दिसतो, त्यामुळे ट्रेडिंग शिकून घ्या. व्यवहारासाठी क्रिप्टो एक्सचेंज प्लॅटफॉर्मची खातरजमा करूनच निवड करा. सामाजिक माध्यमांमध्ये या क्रिप्टोचे दर वाढणार वैगरे अशा अनेक अफवा पसरवल्या जातात त्यावर विश्वास ठेवून गुंतवणूक करू नका. क्रिप्टोमध्ये दीर्घ गुंतवणूक करायची असेल तर अर्थ सल्लागार, अर्थतज्ज्ञ यांचे सहाय्य नक्की घ्या.

# राज्यात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील सर्व स्तरांमधून राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा, तसेच मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने दि.१४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कोरोना प्रतिबंधात्मक नियमांचे काटेकोरपणे पालन करून उत्साहात साजरा करण्याबाबत मराठी भाषा विभागाने एका शासन परिपत्रकाद्वारे कळविले आहे.

राज्यात मराठी भाषेचे संवर्धन, विकास व्हावा, यासाठी राज्य शासन विविध उपक्रम राबवत आहे. मराठी भाषा विभाग मराठी भाषेच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्था आणि व्यक्ती यांना बळ देण्यासाठी कायमच तत्पर असतो. विशेषता: मराठी भाषेचा वापर सर्वच क्षेत्रात व्हावा यासाठी मराठी भाषा विभाग सातत्याने पुढाकार घेऊन कार्यरत आहे. सन २०१३ पासून दरवर्षी दि.१४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जातो. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या मुख्य हेतूने दरवर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करून हा पंधरवडा साजरा करण्यात येतो. सद्याच्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादूर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सर्वत्र घालण्यात आलेले निर्बंध लक्षात ठेवून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाईन साजरे करण्याबाबत शासनाने सूचना दिल्या आहेत. हे कार्यक्रम साजरे करतांना सामाजिक माध्यमे, दूरचित्रवाणी यांचा व्यापक स्वरुपात वापर करून मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यात यावा. सर्व शासकीय कार्यालयांनी त्यांना सुयोग्य असलेले कार्यक्रम आयोजित करून हा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा समारंभपूर्वक साजरा करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत. ज्या ठिकाणी प्रत्यक्षरित्या कार्यक्रम करणे शक्य आहे, त्या ठिकाणी केंद्र व राज्य शासनाने आखून दिलेल्या कोविड प्रतिबंधक सूचनांचे तसेच मार्गदर्शनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या पंधरवडयादरम्यान विविध मराठी भाषेतील तज्ञ, नामवंत व्यक्ती, लेखक यांचे परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा, शिबीरांचे आयोजन, मराठी भाषेसंबंधीत प्रश्नमंजुषा, निबंध, कविता लेखन, वक्तृव स्पर्धाचे आयोजन, ग्रंथ प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच आधुनिक प्रसार माध्यमांमधून मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करावी. शासकीय कार्यालयांमध्ये टंकलेखनाकरीता युनिकोड मराठीचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहीत करावे, मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरूण पिढीला आकर्षित करण्यासाठी अनुवाद लेखन, पुस्तक निर्मिती व प्रकाशन, ऑनलाईन पुस्तक विक्री, शॉट फिल्म डॉक्युमेंन्टरी लेखन अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार वर्जित प्रयोजने वगळता १०० टक्के शासकीय कामकाज मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. तर त्रिभाषा सुत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालय आणि सार्वजनिक उपक्रमांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. राज्यात तसेच जिल्हास्तरावर त्यांच्या अखत्यारीतील कार्यक्षेत्रात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे यासाठी प्रयत्न करावेत व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कोरोना प्रतिबंधात्मक नियमांचे काटेकोरपणे पालन करून उत्साहात साजरा करावा. असे आदेश मराठी भाषा विभागामार्फत देण्यात आले आहेत.

# बाल हक्क सर्वेक्षण आयोगाच्या सर्वेक्षण मोहीमेत ५९ मुलांचे सर्वेक्षण

**लातूर/प्रतिनिधी**

कोविड काळामध्ये अनेक कुटूंबातील बालकांचे आई व वडिलांना कोविडचा संसर्ग झाल्यामुळे अनेक बालकांचे पालक मयत झाले तसेच कुटूंबावर उपासमारीची वेळ आली याचा परिणाम बालकांवर झाला या कारणामुळे अनेक बालके रस्त्यावर आली व भीक मागू लागले. त्यामुळे रस्त्यावर राहणाऱ्या मुलांच्या पालन पोषणाकडे दुर्लक्ष होत असल्याने ही मुले बालमजुरी किंवा बाल गुन्हेगारीकडे वळतात त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या बालकांचा सर्वे करून बालकांचे पुर्नवसन करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आणि राष्ट्रीय बाल हक्क सर्वेक्षण आयोगाच्यावतीने लातूर जिल्ह्यात सर्वेक्षण मोहीम हाती घेण्यात आली.यामध्ये जिल्हाधिकारी तथा जिल्हा कृती दल समितीचे अध्यक्ष पृथ्वीराज बी.पी., पोलीस अधिक्षक कार्यालयाचे प्रतिनिधी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी वर्षा पवार यांच्या प्रमुख मार्गदर्शनाने प्राथमिक (शिक्षणाधिकारी) माध्यमीक (शिक्षणाधिकारी), जिल्हा शल्य चिकीत्सक, सहाय्य आयुक्त समाज कल्याण, महानगरपालिका नगरपालिका, चाईल्ड लाईन लातुर, वन स्टॉप सेंटर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांचे प्रतिनीधी, इत्यादी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रस्त्यावरील मुले, रस्त्याच्या कडेवरील झोपडपट्टीतील मुले, भीक मागणारे मुले अशा मुलांचे सर्वेक्षण करण्यात आले. तसेच एका दिवसामध्ये लातुर जिल्ह्यातील ५९ बालकांचे



सर्वेक्षण करून त्यांची सविस्तर माहिती घेतली व माहीतीसह नोंदणी करण्यात आली.सर्वेक्षणा नंतर या मुलांच्या पुर्नवसनासाठी जिल्हा प्रशासन तातडीने उपाय योजना राबविणार आसुन मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महिला व बाल विकास विभागातर्फे अनाथ बेघर दिवसभर रसत्यावर राहुन जवळच्या झोपडपटटीत राहणा-या आणि कुटूंबासमावेत रस्त्यावर जे बालके राहतात त्यांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. सदर बालके काळजी व संरक्षाणची गरज असल्या कारणाने मा. बाल कल्याण समिती लातुर यांच्या आदेशाने योग्य ते पुर्नवसन करण्यात येईल. दरम्यान रस्त्यावर राहणाऱ्या बालकाचे सर्वे करून मा.सर्वोच्च न्यायालयाला एकत्रीत अहवाल सादर करण्यात येईल या सर्वे नुसार बालकाची बाल मजुरी बालभिक्षेकरी बाल गुन्हेगारी कडे वळतात या बालकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा कृती दल समिती व जिल्हा प्रशासनाच्या वतीने तातडीने उपाय योजना करण्यात येईल अशी माहीती जिल्हा महला व बालविकास अधिकारी वर्षा पवार यांनी दिली.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

17 TO 23 JANUARY 2022 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 15/01/2022 8:06 PM Page 1



# हिंगोली जिल्ह्यात बँक लुटण्याचा प्रयत्न फसला

## लुटारूंनी केलेल्या गोळीबारात कर्मचारी गंभीर जखमी





**हिंगोली/प्रतिनिधी**

वसमत तालुक्यातील चोंढी आंबा येथील चोंढी टी पॉईंटवर असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेत जाऊन तीन चोरट्यांनी बँक लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र अधिकाऱ्यांनी त्यांना दादच दिले नाही, त्यांच्या सतर्कतेने बँकेतील रक्कम सुरक्षीत राहिली तर अवघ्या दोन तासात पोलिसांनी तिघांना जेरबंद केले. शुक्रवारी साडेचार वाजता हा प्रकार घडला. पोलिसांनी पकडलेले दोघे उत्तरप्रदेशातील तर एक जण वसतमचा आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत तालुक्यातील चोंढीआंबा टी पॉईंटवर महाराष्ट्र ग्रामीण बँकेची शाखा आहे. आज साडेचार वाजता बँकेचे अधिकारी इशान खिस्ते, रोखपाल नितीन ननवरे व सेवक भद्रदीप सरोदे हे बँकेत होते. यावेळी एका काळ्या रंगाच्या पल्सर वरून तिघे जण बँके समोर आले. त्यापैकी दोघे जण बँकेत शिरले तर एक जण बँकेबाहेरच थांबला. दोघांनी हातातील बंदूक रोखून कर्मचाऱ्यांकडे पैशाची मागणी केली. मात्र बँक बंद झाली अन पैसे नाहीत असे कर्मचाऱ्यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांकडून दाद मिळत नसल्याने चोरट्यांनी बँकेतून काढता पाय घेतला. मात्र बँकेतून जातांना चोरट्यांनी दोन राऊंड फायर केले. मात्र राऊंड चॅनल गेटला लागल्यामुळे कुठलीही मोठी हाणी झाली नाही, मात्र बँकेची काच फुटून लागल्याने रोखपाल ननवरे जखमी झाल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिक्षक राकेश कलासागर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस अधिक्षक यतीश देशमुख, उपाधिक्षक किशोर कांबळे, कुरुंदा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील गोपीनवार, जमादार गजानन भोपे, करवंदे यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. पोलिसांनी बँकेतील माहिती घेण्यासोबतच सीसीटीव्ही फुटेजवरून चोरट्यांनी ओळख पटविण्याचे काम हाती घेतले. या शिवाय पोलिस अधिक्षक कलासागर यांनी जिल्हाभरात नाकाबंदीचे आदेश दिले. चोंढी शिवारातून आखाडा बाळापूरकडे माळरानावरून चोरटे येतील या शक्यतेने आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक पंढरीनाथ बोधनापोड, कुरुंदा पोलिस ठाण्याचे गोपीनवार, उपनिरीक्षक बालाजी पुंड यांनी पोलिसांना सोबत घेऊन बोथी शिवार गाठले. या घटनेची माहिती बोधनापोड यांनी गावकऱ्यांनाही दिली होती. त्यामुळे पोलिसांच्या मदतीला गावकरीही धावले. दरम्यान, सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास बोथी शिवारात तीनही चोरटे पोलिसांच्या हाती लागले. यावेळी गावकऱ्यांनी त्यांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला. मात्र बोधनापोड यांनी चक्क जीपवर चढून गावकऱ्यांना शांततेते आवाहन केले. त्यानंतर गावकरी शांत झाले. अटक केलेल्या तिघांनाही कुरुंदा येथे आणण्यात आले आहे. पोलिसांनी अटक केलेल्या तिघांमध्ये संदीप मटरू यादव (रा. धोराधार (उत्तरप्रदेश), शाबान जमील अन्सारी (रा. नानापारा, उत्तरप्रदेश) तर आयास अहमद (रा. वसमत) यांचा समावेश आहे. हे तिघेही लिफ्टचे काम करतात. पोलिसांनी त्यांची अधिक चौकशी सुरु केली आहे.

### पोलिस महासंचालकांनी केले अभिनंदन!

बँक लुटीचा प्रयत्न करणाऱ्या तिघांना अवघ्या दोन तासात जेरबंद करण्यास पोलिसांना यश आले. पोलिसांच्या या कामगिरीबद्दल पोलिस महासंचालक संजय पांडे यांनी पोलिस अधिक्षक राकेश कलासागर, अप्पर पोलिस अधिक्षक यशवंत काळे, सहाय्यक पोलिस अधिक्षक यतीश देशमुख, सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील गोपीनवार, पंढरीनाथ बोधनापोड यांचे अभिनंदन केले आहे.

# दोन चोरट्यांना केले जेरबंद; १७ घरफोड्या उघडकीस



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहर गुन्हे शाखेने दोन चोरट्यांना जेरबंद केले असून त्यांच्याकडून १७ घरफोडीतील साडेदहा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती सोलापूर शहर पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. अनंत उर्फ छोटा अंत्या दौलत चव्हाण (३८) व त्याचा आणखी एक साथीदार किसन कुबेर काळे (२२) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. सोलापूर शहरात मागील काही दिवसांपासून दिवसा व रात्रीच्या वेळी एका विशिष्ट पद्धतीने बंद घराचा कडी, कोयंडा व कुलूप तोडून घरफोडी चोरीचे प्रकार घडल्याने विजापूर नाका, एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले होते. विशेषता माहे ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर या तीन महिन्यात घरफोड्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले होते. या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर पोलीस उपायुक्त हरीश बैजल यांनी हे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले होते. अभिलेखावरील व फरारी आरोपींचा शोध घेण्याच्या दृष्टीने गस्त घालत असताना गुन्हे शाखेचे अंमलदार विनायक बर्डे यांना माहिती मिळाली. त्यावरून घरफोडी चोरीतील सोने विकण्यासाठी निघालेल्या आरोपी अनंत चव्हाण व त्याचा साथीदार किसन काळे या दोघांना ताब्यात घेऊन त्याच्याकडे तपास केला. ते दोघे व त्यांचे आणखीन दोन साथीदार अशा चौघांनी शहरात दिवसा व रात्रीच्या वेळी विजापूर नाका पोलीस ठाणे हद्दीत ११ ठिकाणी व एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत ६ ठिकाणी अशा एकूण १७ ठिकाणी घरफोड्या व जबरी चोरी केल्याची कबुली दिली. त्यामुळे त्या दोघांना अटक करून त्यांच्या अन्य दोन साथीदारांचा शोध सुरू केला. या गुन्ह्यातील अटक आरोपी चव्हाण व काळे यांच्या घर झडतीमध्ये एकूण ३७ तोळे सोने व १ किलो ३०० ग्रॅमची चांदी असा एकूण साडे दहा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हे शाखेने एकूण १७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त हरीश बैजल यांच्या आदेशाने पोलीस उपायुक्त बापू बांगर, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. प्रीती टिपरे, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळंके व पोलीस कर्मचारी दिलीप नागटिळक, संतोष फुटाणे, शीतल शिवशरण, सचिन बाबर, विनायक बर्डे आदींनी केले आहे.

# नेरळ येथे राजमाता जिजाऊ शिल्पाचे झाले अनावरण!

**कर्जत/धर्मानंद गायकवाड**

रायगड जिल्ह्यातील नेरळ ग्रामपंचायत सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणुन सर्वत्र परिचित आहे, या ग्रामपंचायतीचा सरपंच पदी सौ. उषा पारधी या विराजमान झाल्यानंतर येथिल कारभार सक्षमपणे सुरु आहे. नुकताच नेरळकरांचा सेवेशी २ ट्रॅक्टर नेरळ ग्रामपंचायतीने खरेदी करुन त्याचा लोकार्पण सोहळा नुकताच कर्जतचे कार्यसम्राट आमदार महेंद्र थोरवे यांचा हस्ते पार पडले आहे. दरम्यान नेरळ विकास आघाडीचा कारभाराचे नेरळ शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. रायगड जिल्ह्यातील नेरळ ग्रामपंचायतीकडे कर्जतचे आमदाह महेद्रशेठ थोरवे यांचे अधिक लक्ष आहे. नेरळचा विकासासाठी आमदार थोरवे विविध निधी उभा करीत आहेत, नेरळ शहरात विविध विकासकामे आमदार थोरवे यांचा माध्यमातुन सुरु आहेत. असे असतानाच आमदार थोरवे यांनी नेरळ पाणी योजनेसाठी ५० कोटी निधी प्रस्तावातीत असुन त्याचा सर्वेही झाला आहे. त्यामुळे नेरळकरांची पाण्याची समस्या कायमची संपणार आहे. नुकताच नेरळ ग्रामपंचायत मधील राजमाता जिजामाता तलावाचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. आमदार थोरवे यांनी या कामासाठी निधीही दिला होता. त्याचा लोकार्पण सोहळा राजमाता जिजाऊ यांचा जंयतीदिनी आमदार महेंद्रशेठ थोरवे यांचा हस्ते पार पडला आहे. यावेळी नेरळचा ग्रामपंचायतीचा सरपंच सौ. उषा पारधी, उपसरपंच मंगेशदादा म्हसकर, माजी प्रभारी सरपंच शंकर घोडविंदे, नेरळ ग्रामपंचायत सदस्य धर्मानंद गायकवाड, राजन लोभी, संतोष शिंगाडे, गीतांजली देशमुख, शिवाली पातदार, श्रद्धा कराळे, उमा खडे, जयश्री मानकामे, रेणुका चंचे यांसह तालुका प्रमुख उत्तम कोळंब,माजी संरपंच व राजिपचे माजी पक्षप्रतोद सावलाराम जाधव, उपतालुकाप्रमुख अंकुश दाभणे, केतन पोतदार, विभागप्रमुख प्रभाकर देशमुख, माजी सरपंच जान्हवी साळुंखे, माजी सभापती सुजाता मनवे, शहरप्रमुख सुधाकर देसाई, गजुभाई वाघेश्वर, उपशहरप्रमुख आबासाहेब पवार, पंढरीनाथ चंचे, रिपाइंचे शहर अध्यक्ष दिनेश आढाव, यासंह अनेक नेरळचे पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान नेरळ शहराचा विस्तार दिवसेंदिवस अधिक वाढत असल्याने नेरळ शहरात ट्रॅक्टरची अधिक आवश्यकत होती, त्यामुळे नेरळ ग्रामपंचायतीने ही दोन टॅक्टर खरेदी केल्याने नेरळकरांची कचरा उचलण्याचीही समस्या आता संपणार असल्याने नेरळकरांमधे समाधानाचे वातावरण पसरले आहे. हे दोन्ही ट्रॅक्टर कर्जतचे आमदार महेद्रशेठ थोरवे यांनी नेरळ ग्रामपंचायतीकडे सोपविली आहेत. आमदार थोरवे यांचे नेरळ शहर आणि परिसराकडे अधिक लक्ष असल्साने नेरळचा विकास होणार असल्याचे सर्वत्र बोलेले जात आहे.

# अंबरनाथ येथे तरुणीवर सामूहिक बलात्कार

**अंबरनाथ/सुनिल तांबे**

मित्र मनाव कुणाला, आणि कुणावर ठेवावा विश्वास! मैत्री हे एक नाते आहे. आपल्याला जे भाऊ-बहीण असतात ते कसेही असो ते मान्य करावे लागतात. पण मैत्री असे नाते आहे ते स्वतः ठरवून घट्ट बनवावे लागतात. मैत्रीत स्त्री-पुरुष हा भेदही नसतो. मैत्री हे एक अनमोल नाते आहे. प्रेमापेक्षा मैत्री महत्त्वाची असते, कारण प्रेम तर सगळ्यांना एकदा तरी रडवते आणि मैत्री ही दुःखा तही हसवते. ज्याला आपले पराक्रम आनंदाने सांगावेसे वाटतात मनातील भावना व्यक्त करताना संकोच वाटत नाही. पाप पुण्य सांगण्यात व कबुली देण्यास कचरत नाही. मित्र हा आपला आपुलकीचा, मोठा शब्द. आपल्या दिन चऱ्या मध्ये घडलेल्या सगळ्या गोष्टी, आपले दुःख, आपले सुखं मित्राला सांगत असतो. कारण काही कोड्याचे उत्तर सुद्धा मित्राला विचारल्या शिवाय आपल्याला कोडं उमगत नाही. आपल्यावर असलेल्या मनावरचे ओझे मित्राच्या माध्यमातून कमी झाल्या सारखे वाटते. घरातील असो वा बाहेरील सगळ्याच गोष्टी मित्रा पर्यंत कशा पद्धतीने सांगता येईल आणि किती लवकर सांगाव्यात अशी अशा असणारा व्यक्ती म्हणजे मित्र. कुठलीही घटना आपल्या आई



वडिलांना, भावाला, बहिणीला, येव्हडाच नाही तर आपल्या नातेवाहिकाला न सांगता आपल्या मित्राला सांगावशी वाटते. आपल्या वैक्तिक गोष्टी घरच्यांना माहित नसतात पण मात्र मित्र मानणाऱ्या संवगळ्याला माहित असतात. म्हणजे आपल्या रक्ताच्या नात्या पेक्सा मित्र ज्यास्त जवळचा वाटतो. मित्र हा शब्द येवडा जवळचा पण त्या मित्र शब्दाला मित्रतवाला कुठे तरी गालबोट लागतो. आणि न होणाऱ्या गोष्टी घडतात. नंतर कितीही प्रयत्न केले तरी पास्तावल्या शिवाय दुसरं तिसरं काहीही उरत नाही.

अशीच घटना अंबरनाथ परिसरात घडली. अंबरनाथ परिसरात असलेल्या जेपी तलावा जवळ एकवीस वर्षीय तरुणीवर सामूहिक बलात्कार झाल्याची खळबळजनक घटना घडली. या घटनेने अंबरनाथ शहर हदरून गेले. याप्रकारणी शिवाजी नगर पोलीस स्टेशनंचे वरिष्ठ पोलीस निरक्षक यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस पथक नेमण्यात आले. तातडीने तपासणी सूत्रे फिरवित तीन आरोपीला अटक केली. पीडित तरुणी कल्याण येते वास्तव्यास आहे. ती रोज आपल्या पोटाची खडगी भरण्यासाठी अंबरनाथ येते एका दुकानाथ कामाला होती. तिचा मित्र हनुमान हिलम व त्याचे मित्र विश्वास मढवी आणि जावेद अन्सारी दुपारच्या सुमारस जेपी तलावाजवळ दारू पिण्यासाठी बसले होते. या दरम्यान हनुमान याने पीडित तरुणीला फोन करून जेपी तलावाजवळ बोलवून घेतले. त्यांनतर हनुमान याने जबरदस्तीने बलात्कार केला. त्या पाठोपाठ हनुमान यांचे मित्र विश्वास मढवी व जावेद अन्सारी यांनी सुद्धा पीडितीवर बडजबरी बलात्कार केला. या घटने नंतर हदरलेल्या तरुणीने थेट शिवाजी नगर अंबरनाथ पोलीस स्टेशनं गाठून. आपल्यावर घडलेल्या घटनेचा प्रकार सांगून त्यांच्यावर तक्रार केली. तिच्या तक्रारी नुसार पोलिसांनी सामूहिक बलात्काराचा गुन्हा नोदोहून घेतला. त्या तिघांचा शोध घेत तिघांना बेड्या ठोकल्या. अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी दिली. अधिक तपास शिवाजी नगर अंबरनाथ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भोघे यांच्या मार्गदर्शना खाली चालू आहे. काही दिवसा अगोदर गांज्या विक्री करणाऱ्या महिलेला अटक केली होती. नंतर ड्रॅग पेडरला अटक केली होती. अंबरनाथ पश्चिम उलन मिल कंपाउंडमध्ये अज्ञान तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून झालेला मृत देह आढळून आला होता. ही घटना ताजी असतांना. त्या पाठोपाठ सामूहिक बलात्काराची घटना घडली. अंबरनाथ शहर गुनेगारी क्षेत्र बनते की काय असे प्रशन चिन्न शहरवाशियांन मध्ये निर्माण होत आहे. गुनेगार हा कितीही मोठा असला तरी खाखी समोर ज्यास्त काळ लपून राहू शकत नाही. तो एकना एक दिवस पकडल्या जातो.

# भिवंडीत मल:निस्सारण उद्दचन केंद्रास स्थानिक नागरिकांचा विरोध



**भिवंडी/प्रतिनिधी**

महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या भुयारी गटार योजने अंतर्गत मल:निस्सारण प्रकल्पाचे काम सुरू असून शहरातील वऱ्हाळ तलाव परिसरातील मानसरोवर फुले नगर या निवासी क्षेत्रात समुद्र सपाटी पासून १०० मीटर उंचीवर असलेल्या ठिकाणी उद्दचन केंद्र बनविले जात असून त्यास स्थानिक नागरिकांचा विरोध होत असून शुक्रवारी मानसरोवर फुले नगर येथील महिला पुरुष यांनी एकत्रित होत पोलिसांनी मोर्चे आंदोलन करण्यास मनाई असल्याचे सांगून ही संतप्त नागरीकांनी काम सुरू असलेल्या ठिकाणी मोर्चाने जात विरोध करीत येथील काम बंद केले. त्यानंतर पोलिसांनी आंदोलनकर्त्या नागरीकांना समजावत त्यांनी पालिका प्रशासन यांच्या सोबत चर्चा करण्याचे सुचवीत येथील आंदोलन थांबविले.या आंदोलनात नगरसेवक श्यामजी अग्रवाल, सामाजिक कार्यकर्ते संदेश पाटील सह स्थानिक नागरिक उपस्थित होते.



# कै.रसिका महाविद्यालय देवणी येथे एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

**देवणी/प्रतिनिधी**

येथील कै रसिका महाविद्यालयात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ग्रामीण भागातील आव्हाने आणि उपाय या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राचे उद्घाटन संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट येथील प्राचार्य डॉ. बी.टी. लहाने यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणीचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर उपस्थित होते, या चर्चासत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव गजानन भोपणीकर, डॉ. नारायण जाधव हे उपस्थित होते. तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. डी. एन.मोरे (सिनेट सदस्य, स्वा. रा.ती.म. विद्यापीठ नांदेड) व डॉ. सूर्यकांत जोगदंड (सिनेट सदस्य, स्वा. रा.ती.म. विद्यापीठ नांदेड) यांची उपस्थिती होती. डॉ.सूर्यकांत जोगदंड यांनी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये केंद्र सरकारने केलेल्या बदलाविषयी सविस्तर असे मत मांडले, तसेच ग्रामीण भागातील उच्च शिक्षणासमोर उभी असलेल्या आव्हानांचा त्यांनी सविस्तर उहापोह केला. प्रमुख वक्ते म्हणून बोलताना डॉ.डी.एन.मोरे यांनी संविधानातील उच्च शिक्षण विषयक तरतुदी आणि सद्यस्थितीतील नवीन शैक्षणिक धोरणातील उच्च शिक्षण विषयीच्या धोरणात्मक विसंगती याविषयी सविस्तर व परखड मत व्यक्त केले.




अध्यक्षीय समारोपात गोविंदराव भोपणीकर यांनी नवीन शैक्षणिक धोरणातील चुकीच्या मसुद्याचा सर्वांनी प्रखरतेने विरोध केला पाहिजे आणि शिक्षणा समोरील आव्हानांचा सर्वांनी एकजुटीने मुकाबला करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे असे प्रतिपादन केले. या चर्चासत्राचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी केले.

या चर्चासत्राचे आयोजन IQC विभाग, रसायनशास्त्र विभाग व प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. व्ही.एस. मोरे व प्रा. डॉ. पुरुषोत्तम मोरे यांनी अतिशय नियोजनबद्धपणे या चर्चासत्राचे आयोजन केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी यांची उपस्थिती होती. ग्रामीण भागातील महाविद्यालयाने अतिशय महत्त्वाच्या विषयावर या चर्चासत्राचे आयोजन करून नवीन शैक्षणिक धोरणाचे चिकित्सकपणे अवलोकन केल्याची प्रतिक्रिया यावेळी उपस्थितांनी दिल्या. चर्चासत्राच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉक्टर सुलोचना डेंगाळे यांनी केले. आभार डॉ. पी. आर. मोरे यांनी व्यक्त केले.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, डॉ.गोपाल सोमाणी प्रा.विजयकुमार मोरे, प्रा सुदर्शन पेडगे, प्रा अंकुश भुसावळे, प्रा महादेव टेंकाळे, डॉ.सचिन चामले,प्रा वैशाली चटगे, प्रा. रेणुका कुनाळे, प्रा. प्रशांत भंडे, प्रा.योगेश मुळे, प्रा. अंकुश भास्कर, प्रा. रंजना बिरादार, प्रा.सी. एम. मलबा, महेश मोरे ,सुमित मोहिते, दीपक पाटील, विजयकुमार भोजने, प्रदीप मोरे, विनोद बिरादार, व्यंकट पांढरे, संतोष मुळे, दयानंद रणदिवे शंकर म्हेत्रे, राजू माने यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# भिवंडीत बूस्टर डोस देण्यास सुरुवात

## शहरातील नागरिकांचे लसीकरण वाढविणे गरजेचे -आयुक्त देशमुख



**भिवंडी/अभिजित हिरे**

देशात आणि राज्यात आरोग्य कर्मचारी, फ्रंट लाईन वर्कर्स यांच्यासाठी तिसरा बूस्टर डोस देण्यास सुरुवात झाली असून भिवंडी पालिका क्षेत्रात पालिका कर्मचारी यांच्यासाठी विशेष केंद्र पालिका मुख्यालयात सुरू करण्यात आले असून त्या ठिकाणी आयुक्त सुधाकर देशमुख, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. के.आर. खरात, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले यांनी सर्वप्रथम बूस्टर डोस घेऊन या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

लसीकरण झालेल्या व्यक्तींना कोरोना लागण झाल्यास लक्षणे कमी आढळून येत असून सध्या रुग्णालयात दाखल होणाऱ्या कोरोना रुग्णां पैकी ९६ टक्के रुग्ण हे लसीकरण न झालेले आढळून येत असल्याने सर्व नागरीकांनी लसीकरण करून घ्यावे असे आवाहन आयुक्त सुधाकर देशमुख यांनी करीत भिवंडी पालिका क्षेत्रात इतर शहरांच्या तुलनेत लसीकरण कमी असून ती चिंतेची बाब आहे त्यामुळे नागरीकांनी अफवां वर विश्वास न ठेवता लसीकरणा करून घ्यावे जेणे करून आपला व कुटुंबीयांचा जीव धोक्यात जाणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन शेवटी केले.

17 TO 23 JANUARY 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 15/01/2022 8:06 PM Page 1



# भिवंडीतील युवा कवी मिलिंद जाधव यांची मॅजिक बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद; 'सर्वोत्कृष्ट कवी' पुरस्काराने सन्मानित!




**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी तालुक्यातील पडघा येथे राहणारे युवा कवी मिलिंद सुरेश जाधव यांची मॅजिक बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली असून बेस्ट अचिव्हर्स अवॉर्ड- २०२१ मधील 'सर्वोत्कृष्ट कवी पुरस्कार' त्यांना प्रदान करण्यात आला आहे. युवा कवी मिलिंद जाधव हे भिवंडी तालुक्यातील समतानगर, पडघा या ग्रामीण भागात राहत असून 'लोकधारा प्रतिष्ठान' ट्रस्टचे अध्यक्ष आहेत. ते विविध विषयावर उत्तम कविता लिहून प्रबोधन करीत असतात. त्यांचा सामाजिक तसेच विविध क्षेत्रांमध्ये नेहमीच सहभाग असतो. विविध कवी, साहित्य संमेलनात त्यांचा सहभाग असून विविध विषयांवर प्रबोधनात्मक कविता शाळेत तर विविध ठिकाणी सादर करीत प्रबोधन करीत असतात. एवढंच नव्हे तर, अष्टपैलू व्यक्तिमत्त्वामुळे एक युवा कवी म्हणून त्यांची ओळख आज इतरांच्या नजरेतून पाहायला मिळते. अनेक कार्यक्रमात ते सूत्रसंचालनाची धुरा सुध्दा सांभाळत असतात. म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेऊन भिवंडी तालुक्यातील पडघा येथे राहणारे युवा कवी मिलिंद सुरेश जाधव यांची मॅजिक बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली असून बेस्ट अचिव्हर्स अवॉर्ड- २०२१ मधील 'सर्वोत्कृष्ट कवी पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वच स्तरातून युवा कवी मिलिंद जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांचे कौतुक केले जात आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदारांना सार्वजनिक सुट्टी

**मुंबई/प्रतिनिधी**

दिनांक १८ जानेवारी २०२२ रोजी राज्यातील ९५ नगरपंचायत, २ जिल्हा परिषद आणि त्या अंतर्गत प्रत्येकी ७ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका तसेच सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका पोट निवडणुकांसाठी या क्षेत्रातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी संबंधित मतदारसंघात सामान्य प्रशासन विभागाने सावर्जनिक सुट्टी जाहीर केली आहे. मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी ही सावर्जनिक सुट्टी खाली नमूद करण्यात आलेल्या मतदारसंघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामासाठी त्या त्या मतदार संघांच्या बाहेर असतील त्यांना देखील लागू राहणार आहे. त्याचप्रमाणे केंद्र शासनाची शासकीय कार्यालये, निम शासकीय कार्यालये, सावर्जनिक उपक्रम, बँका इत्यादींना ही सावर्जनिक सुट्टी लागू राहणार आहे. राज्यातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, नाशिक, धुळे, अहमदनगर, जळगाव, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील ९५ नगरपंचायतींकरिता तसेच भंडारा व गोंदिया जिल्हा परिषदेच्या प्रत्येकी ७ पंचायत समित्या आणि सांगली-मिरज-कुपवाड या एका महानगरपालिकेच्या पोट निवडणुकीकरिता ही सावर्जनिक सुट्टी असेल.

पान १ वरून....

### वसईत सिक्युरिटी गार्डची नोकरी...

खिडकीच्या काचा काढून मेहुल शहा यांच्या घरात प्रवेश केला आणि बेडरूमधील दोन कपाटात असलेले चार सोन्याच्या बांगड्या, सोन्याचे लेडीज ब्रॅसलेट, कानातील दोन डायमंड रिंग, एक डायमंड पॅन्डल आणि २०,००० रुपये रोख तसेच दुसऱ्या कपाटातील दोन सोन्याच्या बांगड्या व एक पुरुषाचे सोन्याचे कडे असे एकूण अंदाजे ८ लाख रुपये असा ऐवज चोरीला गेला होता. या प्रकरणी माणिकपूर पोलीस ठाण्यात मेहुल शहा यांच्या फिर्यादीवरून गु.र.क्रमांक ०६/२०२२ कलम ३८०, ४५४, ४५७, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर माणिकपूर पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे नाशिक मधेच या टोळीतील चोरांना अटक करण्यात आली होती. पण त्यांच्या वडिलांच्या नावातील तफावतीमुळे पकडलेले आरोपी ते नाहीत असे सुरवातीला पोलिसांना वाटले.

त्यामुळे त्यांना सोडून देण्यात आले. पण हे आरोपी नेपाळला पळून जाण्याच्या तयारीत होते आणि निघाले सुद्धा मात्र सीसीटीव्ही फुटेज आणि ते ज्या रेल्वेने भारत-नेपाल बोर्डर पर्यंत जाणार होते, त्या गाडीतील प्रवाशांच्या लिस्टमध्ये या आरोपींचे नाव सापडले आणि सनसिटीमध्ये घरफोडी करणारे आरोपी हेच आहेत याची खात्री पटताच पोलिसांनी विमानाने भारत-नेपाल बॉर्डरवरील बहराईच गाठले. रुपईडीहा चेक पोस्टवर सापळा रचून धरमराज दयाराम ढकाल (सिक्युरिटी गार्ड रा. नेपाल), राजेश पदम जोशी उर्फ तप्तराज पदमराज देवेकोटा (रा.नेपाळ) आणि अर्जुन उर्फ नरेश धरमराज ढकाल यांना अटक केली. त्यांच्याकडून १२४ ग्राम सोन्याचे दागिने, ६८०० रोख आणि तीन मोबाईल असा ५२४४८० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. सदरची कारवाई परिमंडळ २ चे पोलीस उपयुक्त संजय कुमार पाटील वसई विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त प्रदीप गिरीधर, माणिकपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजित मडके, स.पो.नि सचिन सानप, उपनिरीक्षक भोपळे, पो.न. धनंजय चौधरी, शामेश चंदनशिवे, गोपाल कोळेकर, प्रवीण कांदे यांनी भाग घेतला.

### चारित्र्याचा संशय प्राणावर बेतला...

गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी पतीला अटक करण्यात आली आहे. त्याला न्यायालयाने चार दिवसांची कोठडी दिली आहे. अश्विनी सुनील पोटरे (३०) असे खून झालेल्या महिलेचे नाव असून आरोपी सुनील चांगदेव पोटरे (३२) याचे व पत्नी अश्विनी यांचे रविवारी भांडण झाले होते हे भांडण इतके विकोपाला गेले की पती सुनील याने लोखंडी सळई अश्विनीच्या छातीमध्ये घालून गंभीर जखमी केले. सदरची लोखंडी सळई अश्विनीच्या फुफ्फुसापर्यंत घुसली. अश्विनीला टेंभुर्णी येथे पाटील हॉस्पिटलमध्ये आणले पुढील उपचारासाठी तिला सोलापूर येथे पाठवण्यात आले. मात्र रस्त्यातच अश्विनीचा मृत्यू झाला. पोलिसांनी पती सुनील यास अटक केली असून त्याच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना एक दहा वर्षाचा मुलगा व सहा वर्षाची मुलगी अशी दोन अपत्ये आहेत. सदरची फिर्याद आरोपीचा भाऊ रघुनाथ चांगदेव पोटरे यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात दिली आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक धनाजी ओमासे हे करीत आहेत.

### पुतणीच्या कौतुकाने काकीचा जळफळाट...

होती. मनातील रागातून तिने मानवीचा काटा काढण्याचे ठरवले. पुतणी व काकू असे मानवी व दिपाली यांचे नाते होते. जवळचे जिव्हाळ्याचे नाते असून देखील काकू असलेल्या दीपालीने पुतणी मानवीला संपवण्याचा क्रुर निर्णय मनाशी घेतला होता. दिपाली संधीच्या शोधात होती. दिपाली ही मानवीवर बारकाईने लक्ष ठेवून होती. १२ डिसेंबर २०२१ रोजी दुपारच्या वेळी मानवी अंगणात खेळत होती. त्यानंतर ती अचानक नाहीशी झाली. ती गायब झाल्याचे तिच्या पालकांच्या लक्षात आले. ते तिची शोधाशोध करु लागले. मात्र त्यांची शोधाशोध व्यर्थ गेली. ती कुठेही आढळून आली नाही. पोलीस पाटील व गावकऱ्यांनी या घटनेची माहिती पोलीस स्टेशनला दिली. पोलीस निरीक्षक पितांबर जाधव तातडीने हालचाली करत चौकशीला सुरुवात केली. तीन वर्षाची मुलगी अचानक बेपत्ता होण्याच्या घटनेने खळबळ माजली होती. पोलीस निरीक्षक पितांबर जाधव, स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, उप निरीक्षक देशमुख, पायघान, सायबरचे पोलीस निरीक्षक पुरी, पी.एस.आय. खंडार, पी.एस.आय. पवार, विजय चव्हाण, सिताराम पवार, दिनेश जाधव, अमित झेंडकर, मनोज चक्राण, सचिन पिसे, वाहनचालक गावडे यांनी वन विभागाच्या मदतीने जंगलाचा परिसर पिंजून काढला. तरीदेखील मानवीचा शोध लागला नाही. वाईल्डलाइफचे लोकेशन आणि फुटेज संकलित करत कोणता प्राणी कुठे किती वाजता होता याची माहिती घेण्यात आली. मात्र सर्व व्यर्थ गेले. पोलीस अधीक्षक दिलीप पाटील भुजबळ यांनी गावाला भेट देऊन घटनास्थळाची पहाणी केली. गावकऱ्यांना आश्वासन देत यातील आरोपीला आम्ही कोणत्याही परिस्थितीत अटक करु असे सांगितले. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस, पोलीस अधीक्षकांचे पथक, सायबर क्राईमचे पथक, वनविभागाचे कर्मचारी एकजुटीने तपास कामी लागले. या प्रकरणातील आरोपी ही तिची काकूच असल्याचा संशय सुरुवातीला कोणालाच आला नव्हता. पोलीस अधीक्षक भुजबळ गावात आले तेव्हा त्यांनी गावकऱ्यांना दिलासा दिला. यातील आरोपी कोणत्याही परिस्थितीत सुटणार नाहीत असे ठामपणे सांगितले. ही सर्व चर्चा दिपाली गोपाल चोले दरवाजात बसून ऐकत होती. दिपालीने दि. १२ डिसेंबर रोजी दुपारी मानवीचे अंगणातून अपहरण केले. तिला घरातील पाण्याच्या टाक्यांमध्ये बुडवून-बुडवून तिचा जीव घेतला. ती मरण पावल्याची खात्री झाल्यानंतर दिपालीने तिचा मृतदेह स्वयंपाक घरात आणून स्टीलच्या कोठीमध्ये लपवून ठेवला. त्या कोठीवर मिक्सर आणि वजनदार वस्तू ठेवल्या. जणू काही घडलेच नाही असे ती दाखवत होती. पोलिसांचे, लोकांचे बोलणे ऐकत होती. आपण काही या प्रकरणात सापडत नाही असे तिला वाटत होते. दि. २० डिसेंबरपासून गावात पोलिसांची वर्दळ वाढली. सगळीकडे चर्चेला उधाण आले होते. त्यामुळे दिपालीला मृतदेह बाहेर काढण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. त्यातच जिल्हा पोलीस अधीक्षकांनी गावाला भेट देऊन गावकऱ्यांना ठोसपणे आश्वासन दिल्यामुळे दिपाली घाबरली होती. आता आपले बिंग फुटणार या भीतीने तीची गाळण झाली होती. काही दिवसांनी मानवीच्या मृतदेहाची दुर्गंधी पसरण्यास सुरुवात झाली होती. सुरज कतोरे नावाचा तरूण या महिलेच्या शेजारी रहातो. सर्वात आधी दुर्गंधी येत असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याने दुर्गंधीचा शोध घेण्यास सुरुवात केली. गावात चर्चेला तोंड फुटले होते तर दुसरीकडे कुजलेला मृतदेह किती दिवस घरात लपवून ठेवणार या भीतीने दिपाली हादरली. तिच्या कृत्याची तिच्या पतीसह सासू-सासऱ्यांना अजिबात माहिती नव्हती. दिपालीला कोठीमधून मानवीचा मृतदेह काढून बाहेर फेकून देण्याची खूप घाई झाली होती. मात्र तिला संधीच मिळत नव्हती. अखेर दि. २६ डिसेंबर रोजी तिचा पती गोपाल बाहेर गेला. सासू-सासरे बाहेर शेकोटी करुन बसले होते. ही संधी साधून दिपालीने घाई-गडबडीत स्टीलची कोठी उचलून घराच्या बाहेर एका नाल्याकाठी गेली.त्याठिकाणी तिने तो मृतदेह फेकून दिला. त्या कोठीला घेऊन ती परत घरी आली. घरी आल्यानंतर तिने ती कोठी स्वच्छ केली. मानवीचा कुजलेला मृतदेह बाहेर फेकून देताच मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरण्यास वेळ लागला नाही. ही दुर्गंधी कशाची आहे याचा शोध घेतला असता दिपाली चोले हिच्या घराशेजारी कुजलेला मृतदेह आढळून आला. हा मृतदेह मानवीचा असल्याचे प्रथमदर्शनी समोर आले. त्यामुळे तिच्या मातेने हंबरडा फोडला. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस ताफा गावात पोहोचला. श्वानपथक फिंगरप्रिंट एक्स्पर्ट, सायबर क्राईम के पोलीस असे वरीष्ठ अधिकारी गावात दाखल झाले. दि. २० डिसेंबरपासून मानवीचा शोध घेणाऱ्या पोलिसांना अखेर मानवीचा मृतदेह हाती लागला.

घटनास्थळावर श्वान लुसीला पाचारण करण्यात आले. श्वान लुसीने अतिशय मोलाची भूमिका बजावत नाल्याच्या काठावरून सरळ दिपाली गोपाल चोले हिच्या स्वयंपाक घरात मार्ग दाखवला. पोलिसांनी लगेच गोपाल चोले याला ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केली असता त्याला याबाबत काहीच माहिती नसल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी त्याची पत्नी दिपाली हिला ताब्यात घेतले. तिची चौकशी केली असता तिने गुन्ह्याची कबुली दिली. मीच मानवीचे अपहरण करुन तिला पाण्यात बुडवून मारले. तिला स्टीलच्या कोठीमध्ये डांबून ठेवले. मात्र गावात पोलिसांची आणि गावकऱ्यांची कुजबूज सुरु झाल्यामुळे तिचा मृतदेह बाहेर फेकण्याची मला कोणतीही संधी मिळाली नाही. म्हणून दि. २६ डिसेंबर रोजी मानवीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह नाईलाजास्तव मला घराबाहेर फेकावा लागल्याची कबुली तिने पोलिसांना दिली. दिपाली उर्फ पुष्पा गोपाल चोले (२३) या महिलेस पोलिसांनी गु.र.न. ९७९/२१ भा.द.वि. ३६३, ३०२, २०१ अन्वये अटक केली.

### प्रेयसीच्या बाळाची प्रियकरानेच विक्री...

घेत बलिकेचा शोध घेण्यासाठी व.पो.नि संध्याराणी भोसले व पोलीस निरीक्षक (गुन्हे) विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व्ही.पी. मार्ग पोलिसांनी पाच पथके तयार केली. अपहृत बाळाचा शोध सुरू केला. या पथकातील अधिकारी व अमलदार यांनी गुन्हयाचा बारकाईने अभ्यास करून तसेच गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे मिळालेल्या माहीतीवरून गुन्हयातील एक संशयित आरोपी इब्राहीम अलताफ शेख यास प्रथम ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्याची चौकशी केली. तेव्हा तो बलिकेबद्दल काही बोलत नव्हता. मला काही माहिती नाही असे सांगत पोलिसांची दिशाभूल करत होता. शेवटी पोलिसांनी आपला हिसका दाखवल्यावर तो ताळ्यावर आला. तेव्हा कुठे तो बोलता झाला. त्याने स्वतः मुलीला पळवून नेवून मुंबईत मुलांची विक्री करणाऱ्या एका टोळीला तिला विकल्याचे सांगितले. त्याप्रमाणे पोलीस मुलीचा व त्या टोळीचा शोध घेत फिरू लागले. सायन, धारावी, मालाड, जोगेश्वरी, नागपाडा, कल्याण, ठाणे अशा विविध परिसरात पोलिसांनी छापे टाकुन २ महीला व ४ पुरूष अशा एकुण ६ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून या संशयितांची कसून चौकशी करण्यात आली. तेव्हा या सहा जणांनी चार महिन्याच्या अपहृत बालीकेस त्यांनी कर्नाटक आणि तामिळनाडु राज्यामध्ये विक्री केल्याचे सांगितले. बालिकेचा शोध घेण्यासाठी व तिची सुखरूप सुटका करण्यासाठी पोउनि दिलीप तांबे आणि पोउनि अभिजित देशमुख यांची दोन पथके तामिळनाडु व कर्नाटक या राज्यामध्ये तपासाकरीता तात्काळ रवाना करण्यात आली. ही पथके दोन्ही राज्यात मुलीचा शोध घेत फिरत होते, मात्र कुठलेही धागेदोरे मिळत नव्हते. आरोपींनी मुलीला तामिळनाडु व कर्नाटक या दोन राज्यात विक्री केल्याचे सांगितले. त्यामुळे मुलीला शोधून काढणे शक्य नसले तरी अशक्य ही नव्हते. पोलिसांनी सर्व ताकत पणाला लावली होती. महाराष्ट्रातून मुले चोरून ती परराज्यातील टोळीना विकणे या मागे खूप मोठे रॅकेट असावे असा पोलिसांना संशय होता. तो खरा ठरला होता. कारण त्यांनी मुंबई व आजूबाजूच्या परिसरातून एकूण सहा आरोपींना अटक केली होती. त्यात महिलांचा देखील सहभाग होता. याच दरम्यान पोउनि तांबे यांच्या पथकाला खबऱ्याकडून माहिती मिळाली की, अपहृत मुलगी तामिळनाडु राज्यात आहे. म्हणून ते तामिळनाडू येथे दाखल झाले आणि त्या राज्यातील तीन जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी आरोपीतांचा व अपहृत बालीकेचा शोध घेत फिरत होते. सतत चार दिवस अविरत विश्रांती न घेता चिकाटीने, मानवी कौशल्य वापरून व तांत्रिक तपास करून शोध घेतला असता अपहृत मुलगी ही सेलवानपट्टी पोलीस स्टेशन, कोईमतुर, तामिळनाडु येथे असल्याची पक्की खबर पोलिसांनी मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तेथे छापा टाकून अपहृत मुलीची आरोपींच्या तावडीतून सुखरूपणे सुटका केली. तिला कायदेशीररित्या सुखरूपपणे आपल्या ताब्यात घेतले. त्यानंतर या गुन्हयात सहभागी असलेल्या तामिळनाडु येथील १ महीला व ४ पुरूष अशा एकुण ५ आरोपीतांना देखील ताब्यात घेतले. त्यांना मुंबईत आणण्यात आले. सुरुवातीला पकडलेले ६ आणि नंतर पकडलेले ५ असे एकूण ११ आरोपींकडे समोरासमोर चौकशी करून व्ही.पी.रोड पोलिसांनी त्यांना या गुन्ह्यात अटक केली. इब्राहीम अल्ताफ शेख (वय ३२) , मोहम्मद शेरखान उर्फ शेरू पिर मोहम्मद खान (वय ३९), लक्ष्मी दिपक मुरगेश (कौंडर) (वय २८), सद्दाम अब्दुल्ला शाह (वय २६), अमजद मुन्ना शेख , (वय ३८), ताहीरा उर्फ रेश्मा गुलाब नबी शेख (वय ३५), कार्तिक राजेद्रन (वय ३१), श्रीमती चित्रा कार्तिक (वय २३ ), तमीळ सेलवन थंगराज (वय ३६), मुर्ती पलानी सामी (वय ३९), आनंदकुमार नागराजन (वय ४४) अशी अटक करण्यात आलेल्या या ११ आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी त्यांच्या कडून ४४ हजार रुपये व एक १५ हजार रुपयांचा मोबाईल फोन हस्तगत केला आहे. पोलीस तपासात बऱ्याच्या गोष्टींचा खुलासा झाला. अपहृत मुलीची आई आणि आरोपी इब्राहिम हे दोघे लिव्ह-इन रिलेशनशिपमधे राहात होते. दोघांचाही एकमेकांवर विश्वास होता. त्यामुळे ते गेली कित्येक वर्षे सोबत राहत होते. २७ डिसेंबर रोजी मुलीची आई कामा निमित्त बाहेर गेली होती .तिने आपले मूल शेजारील अन्वरी अब्दुल रशीद शेख या महिलेकडे सांभाळायला दिले होते. यावेळी इब्राहीम अल्ताफ शेख याने चार महिन्याच्या बालिकेला लस देण्याच्या बहाण्याने तिच्या घरातून उचलून नेले. बराच वेळ झाला तरी तो परत आला नाही. फिर्यादी महिलेने शेजारीपाजारी यांना ही या घटनेची माहिती दिली. त्यावेळी शेजाऱ्यांनी देखील इब्राहीमसह मुलीचा शोध घ्यायला सुरुवात केली. मात्र कुठेही तो मिळून आला नाही. शेवटी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली. सुरुवातीला इब्राहिम शेख याचा शोध घेऊन त्याला अटक करण्यात आली. तेव्हा पोलिसांना असे समजले की, तामिळनाडूतील एका जोडप्याला मूल हवे होते. त्याचवेळी एका डॉक्टरने सांगितलं की, काही रकमेच्या बदल्यात बाळ देण्यास मी तुमची मदत करेन. त्यानंतर डॉक्टरांनी रॅकेटमध्ये असलेल्या महिलांशी संपर्क साधला आणि इब्राहिम शेख यांच्यापर्यंत पोहचले. चौकशीत त्याने मित्र मोहम्मद शेरखान उर्फ शेरू पिर मोहम्मद खान याचे नाव घेतले. पोलिसांनी शेरूला ताब्यात घेतले आणि शेरुच्या चौकशीला सुरुवात केली. शेरूच्या चौकशीत त्याने सद्दाम अब्दुला शाह याचे नाव घेतले. सद्दामची पत्नी लक्ष्मी मुरगेश ही तामिळनाडूच्या मूर्ती पलानि सामी (वय ३९) हिच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली. अशा प्रकारे एकूण ११ आरोपी हे एकमेकांनच्या संपर्कात आले .त्या मुलीचा सौदा करण्यात आला .त्यानंतर हा व्यवहार ४ लाख ८० हजार रुपयांना ठरवला. त्यानंतर मुलीला या रॅकेटमधील महिलांच्या ताब्यात देण्यात आले. पुढे या सर्व कटाचा सूत्रधार इब्राहिम शेख असल्याचे पोलीस तपासात निष्कर्ष झाले .कारण त्याने मुलीचा सौदा करतेवेळी ही मुलगी माझी आहे .मी तिचा पालक आहे असा दावा केला आहे.मूल विक्रीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मुलीला त्यांनी आधी कर्नाटकला नेले होते. त्यानंतर तामिळनाडू येथील सेलम जिल्ह्यात असलेल्या एका गावात नेले.

त्यानंतर मुंबईच्या व्ही. पी. मार्ग पोलिसांची एक टीम त्या गावात गेली. तामिळनाडूमधली आणखी दोन ठिकाणीही शोध घेतला. अखेर कोइम्बतूरजवळच्या सेलवानपट्टी गावात ही मुलगी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर तपास पथकाने मुलीची सुखरूप सुटका करून तामिळनाडूतून पाच जणांना अटक केली. या रॅकेटचा मुख्य सूत्रधार असलेला डॉक्टर मात्र पसार झाला असून, त्याचा शोध सुरू आहे. अशाप्रकारे या गुन्हयात सर्व पोलीस पथकांनी आपले मानवी कौशल्य पणास लावुन जलद गतीने गुन्हा उघडकीस आणला आहे. यातील अपहृत बालीकेची आई ही १ जानेवारी पासुन तिच्या कामाकरीता बाहेर गेली ती अद्याप परत आलेली नाही, तीचा शोध सुरू आहे. तसेच आरोपी इब्राहीम शेख हा बालीकेच्या आईचा मित्र असुन तो लिव इन रिलेशनशिपमध्ये तिच्यासोबत राहत होता. तो बालीकेचा वडील असल्याचे सांगत आहे. तरी बालीकेच्या पालकांची निश्चित ओळख पटण्याकरीता बालीकेची व इब्राहीम याची डी.एन.ए. टेस्ट करण्याची प्रक्रिया चालु आहे. सध्या अपहृत बालीका हीला बाल कल्याण समीती समोर हजर करून त्यांचे आदेश प्राप्त करून सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले आहे. या गुन्हयाचा तपास पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) विश्वास नांगरे पाटील, अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग दिलीप सावंत, परिमंडळ २चे पोलीस उपायुक्त सौरभ त्रिपाठी, सहाय्यक पोलीस आयुक्त, (गिरगांव विभाग) राजेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संध्याराणी भोसले व तपास अधिकारी पोलीस निरीक्षक (गुन्हे) विनायक पाटील, सपोनि अमित भोसले, सपोनि अविनाश शिंदे, पोउनि दिलीप तांबे, पोउनि राहुल पाटील, पोउनि हेमंत उगले, पोउनि उषा मस्कर, पोउनि अभिजित देशमुख, पोउनि सचिन आव्हाड, पोह सलीम मुजावर, पोना रूपेश परब, पोना मुन्ना सिंग, पोशि सचिन बरकडे, पोशि संदिप रोकडे, मपोशि शुभांगी देशमुख आणि मपोशि महाबली मुदिनकेरी यांनी अथक परिश्रम घेवुन हा गुन्हा उघडकीस आणला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

पान ८ वरून....

### माहिम केळवे धरण गळतीबाबत वेळीच...

पाटबंधारे योजनेअंतर्गत असलेल्या धरणात गळती लागली होती. या गळती प्रतिबंधक उपाययोजनांच्या कामाची पाहणी पालकमंत्री दादाजी भुसे यांनी करुन वरीष्ठ अधिकारी यांना सुचना केल्या त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा वैदेही वाढाण, आमदार राजेश पाटील, जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिध्दाराम सालीमठ, पोलीस अधिक्षक दत्तात्रेय शिंदे तसेच पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते. धरणाची गळती होत असल्याची माहिती मिळताच जिल्हा प्रशासनला आपातकालीन उपाययोजना करण्याच्या सुचना देण्यात आल्या. जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांच्या देखरेखेखाली गळती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या असून भविष्यात धरण अधिक सुरक्षित करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. धरणामध्ये सध्यास्थितीत २.४६ द.ल.घ.मी. पाणीसाठा उपलब्ध असून गळती प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी आवश्यक ०.५० द.ल.घ.मी. पिण्याच्या पाण्याचा पाणीसाठा राखीव ठेवून २.०० द.ल.घ.मी. पाणीसाठा मार्च अखेरपर्यत कमी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सध्यास्थितीत धरणाच्या अन्य भागातून पाणी सोडण्याचा पर्यायाचा अभ्यास करण्यात येत आहे. यामुळे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात येणार असल्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले.

### औषधांच्या गंभीर रिएक्शन झालेल्या...

त्यानंतर सुमितला उपचारासाठी बालरोग अंतररुग्ण विभागात दाखल करण्यात आले. ड्रग रिएक्शनमुळे संपुर्ण शरीरात जंतुसंसर्ग होऊन जवळपास ४५ टक्के त्वचेवर व डोळ्यांवर परिणाम होऊन त्याच्या लिव्हर व किडनी या दोन्ही अवचवांना संसर्ग झाला होता. त्यामुळे सुमितवर बालरोग तज्ज्ञ डॉ. विद्या कांदे, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. स्मीता चाकोते व नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. सय्यद मोहमंद यांच्या निगराणीखाली संयुक्तपणे उपचार सुरु करण्यात आले. दरम्यान पहिले चार दिवस अंगावरील पुरळ वाढून संपुर्ण शरीरावर सुज आल्याने त्यास गिळण्यास त्रास होत हाता व उठताही येत नव्हते. त्याच्या शरीरातील पाण्याची पातळी स्थिर करणे, जंतुसंसर्ग रोखण्यासाठी ण्टीबायोटीक आणि आजार पसरु नये म्हणून पुरक उपचार करण्यात आले. २० दिवसांच्या उपचारानंतर हळु-हळु त्याच्या प्रकृतीत सुधारणा होऊन त्याच्या त्वचेवरील पुरळ, होत असलेला रक्तस्त्राव व डोळ्यांतील लालसरपणा कमी झाला. दरम्यान एक महिन्याच्या उपचारानंतर सुमित पुर्णपणे बरा झाला असून त्याला नुकतीच रुग्णालयातून सुट्टी करण्यात आली आहे. टॉक्सिक एपिडर्मल नेक्रोलिसिस ही अत्यंत गंभीर ड्रग रिएक्शन असून यात रुग्ण सुरुवातीला एकदम गंभीर अवस्थेत जातो. त्यासाठी त्याला वेळेत योग्य उपचार मिळणे आवश्यक असते. अन्यथा रुग्णाच्या जिवीतास धोका होऊ शकतो. यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात एकाच छताखाली बालरोग, त्वचारोग व नेत्ररोग सुविधा उपलब्ध असल्याने सुमितवर यशस्वी उपचार करता आले असे बालरोग तज्ज्ञ डॉ. विद्या कांदे यांनी सांगीतले. सुमित कांबळे याच्यावरील उपचारासाठी बालरोग तज्ज्ञ डॉ. शिल्पा दडगे, डॉ. दत्तात्रय कुलकर्णी, डॉ.प्रविण डोरले, डॉ.स्वप्नीता गुट्टे, डॉ. रोहित माले, डॉ. व्यंकटेश, डॉ. अखिलेश, डॉ.अपर्णा, डॉ. सोनल, त्वचारोग तज्ज्ञ डॉ.ऐश्वर्या गायकवाड, डॉ.अर्पीता देशपांडे, डॉ. राम धनुका, डॉ. अजय मोरे, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.हर्षल अंबाडे व बाल दंतरोग तज्ज्ञ यांनी सहाय्य केले.

### आदिगुरू रेणुकाचार्य संस्कृती भवना ...

देवर्जनकर, किशोर मठपती, विनोदे देवर्षे, महारुद्र स्वामी तोंडार, गुरुनाथअप्पा स्वामी झरीकर, रामलिंग झुंगा, ज्योती गणेश स्वामी, डॉक्टर भाग्यश्री घाळे, जगदेवी झुंगा, आरती मठपती, मनोरमा स्वामी, सुलोचना स्वामी, सुवर्ण स्वामी, अश्विनी स्वामी, भागीरथीबाई स्वामी, उषा स्वामी, मल्लिकार्जुन स्वामी, शिवकुमार मठपती सूर्यकांत पत्रे, नागेश नागेश चापूले, सुनील चापूले, महादेव कानडे आदींसह इतर समाज बांधवांनी अथक परिश्रम घेतले.

### राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद...

सुसंस्कारी मार्ग दाखऊन दिला. अशा या दोन्ही महान व्यक्तिमत्त्वाचे विचार व आचार सर्वांनी आत्मसात करावेत, असे आवाहनही प्राचार्य केंद्रे यांनी केले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, मदन धुमाळ, राजीव मुंढे, सुधाकर लोहकरे, सुनीता जवळे, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते आदी उपस्थित होते.

17 TO 23 JANUARY 2022 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 15/01/2022 8:07 PM Page 1



# मानवी जीवनाची चिकीत्सा आणि समीक्षा म्हणजे तत्त्वज्ञान ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांचे प्रतिपादन

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात तत्त्वज्ञान अभ्यास मंडळ उद्घाटन समारंभ



**लातूर/प्रतिनिधी**

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये मानवी मूल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवी जीवनाची चिकीत्सा व समीक्षा म्हणजे तत्त्वज्ञान होय असे प्रतिपादन महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत तथा तत्त्वज्ञ प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांनी व्यक्त केले. तत्त्वज्ञान विभाग व आय.क्यू.ए.सी. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रमानिमित्त ऑनलाईन तत्त्वज्ञान अभ्यास मंडळ उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता यामध्ये ते उद्घाटक म्हणून उच्च शिक्षणामध्ये मूल्य शिक्षणाची आवश्यकता या विषयावर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर सिद्राम डोंगरगे हे होते तर यावेळी तत्त्वज्ञान विभागप्रमुख डॉ.शीतल येरुळे, प्रा.अलका चिखुर्डेकर, प्रा.वैशाली दिवे, प्रा.सोनू स्वामी, प्रा.शिवशंकर कामाजी आणि प्रा.रत्नाकर केंद्रे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार म्हणाले की, विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मानवाच्या गरजा पूर्ण होतात. आपल्याला मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग आपण स्वतःसाठी करायचा की इतरांसाठी करायचा हे आपण निश्चित केले पाहिजे. सुखी जीवनासाठी व्यक्तीकडे तात्विक दृष्टिकोन असणे अत्यंत आवश्यक आहे. मानवी जीवन आणि तत्त्वज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे. शिक्षणाने व्यक्ती ज्ञान संपन्न होण्याबरोबरच ती चारित्र्य संपन्न झाली पाहिजे. शिक्षण व्यवस्थेमध्ये ज्ञान निष्ठा, ध्येय निष्ठा, संयमीपणा आणि शहाणपन असणे नितांत आवश्यक आहे. मात्र आज शासन, संस्थाचालक, शिक्षक व विद्यार्थी यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याची खंतही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. या ऑनलाईन उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक करताना तत्त्वज्ञान विभागप्रमुख डॉ.शीतल येरुळे म्हणाल्या की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर हे मराठवाड्यातील विज्ञान, कला, वाणिज्य आणि समाजकार्य अशा चार शाखा चालविणारे एकमेव महाविद्यालय आहे. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकामध्ये कायक वे कैलास हा मंत्र दिला त्याला अनुसरून महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

आज महाविद्यालयामध्ये तत्त्वज्ञान मंडळ उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला आहे यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन त्यांना नेतृत्व विकासाची संधी प्राप्त करून दिली जाते असेही त्या म्हणाल्या. या उद्घाटन समारंभाचा समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी उच्च शिक्षणामध्ये मूल्य शिक्षणाची आवश्यकता ही सोदाहरण स्पष्ट करून सांगितली. आज आपण सर्वांनी श्रम संस्कृतीचे जतन केले पाहिजे. तसेच विवेकवादी दृष्टिकोन आपण प्रत्यक्ष मानवी जीवनाच्या कृती मध्ये अमलात आणला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या आई-वडिलांची सेवा केली पाहिजे यातूनच खऱ्या अर्थाने मानवी मूल्यांची कृतिशील प्रेरणा आपल्या आचरणातून व्यक्त होईल असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शिवशंकर कामाजी यांनी तर आभार प्रा.अलका चिखुर्डेकर यांनी मानले. यावेळी तत्त्वज्ञान अभ्यास मंडळ अध्यक्ष प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे, सचीव आदेश आदडूळे, सहसचिव ज्योतिराम घोडके, कोषाध्यक्ष कु.भाग्यश्री पांढरे,सदस्य श्रीराम देशपांडे, कु.रागिणी हारके, कु. वैशाली सरवदे व ईतर सर्व पदाधिकाऱ्यांचे मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करून पूढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला लोणी (प्रवरा नगर) महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अनुराधा दुबे, डॉ.मा.ना. गायकवाड, डॉ. दिनेश मौने, डॉ.संजय गवई, प्रा.व्यंकट दुडिले, प्रा.गुणवंत बिरादार, प्रा.एस.एम. पाटील, डॉ. अभयकुमार धाराशीवे, प्रा.बी.पी. पवार, राम पाटील, योगीराज माकने यांच्यासह तत्त्वज्ञान विभागातील पदवी व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सोलापूरातील मार्डी शिवारात पाणी पिण्यासाठी गेलेल्या तीन मुलींचा शेततळ्यात बुडून दुर्दैवी मृत्यू

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



मार्डी ता. उत्तर सोलापूर येथील शिवारात सदाशिव जगताप यांच्या शेतातील ८ ते १० फूट खोलीच्या शेततळ्यातील पाण्यात बुडून तीन मुलीचा मृत्यू झाला आहे. ही घटना बुधवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. आकांशा युवराज वडजे (१३), पूजा विजय गरड (१४), सानिका विजय गरड (१८) अशी मरण पावलेल्या मुलींची नावे आहेत. मार्डी शिवारातील सदाशिव जगताप तुरीचे जळण गोळा करण्यासाठी गेल्या होत्या. सोबत आकांशाची आई कविता वडजे व लहान बहिण विशाखा वडजे चौथीतील (१०) हे सर्वजण जगताप यांच्या शेतात गट क्रमांक ३४५ या तुरीचे जळण गोळा करत होते. त्यावेळी तहान लागल्याने शेततळ्यातील पाणी पिण्यासाठी पूजा गरड ही शेततळ्यात गेली असता पाय घसरून पाण्यात पडली. तिला काढण्यासाठी आकांशा वडजे ही शाळकरी मुलगी गेली असता, तीही पाण्यात बुडाली. या दोघीही परत न आल्याने सानिका गरड ही गेली असता तीही पाण्यात बुडून तिघींचा मृत्यू झाला. विशाखा वडजे (१०) ही शेततळे भोवताली शेतातील हरभरा खात होती तिने शेततळ्यात येऊन पाहिले असता तिघेही पाण्यात बुडालेल्याचे दिसल्याने तिने आई कविता हिला बोलावून आणले. ३ मुली मुली शेततळ्यात बुडून तळाळी गेल्याचे पाहताच तिने आक्रोश करण्याला सुरुवात केली. ही माहिती शेजारील शेतकरी व गावातील नागरिकांची शेततळ्यावर मोठी गर्दी पाहायला मिळाली. तर मुलीच्या आई सह नातेवाईकांचा मोठा आक्रोश यावेळी पाहायला मिळाला. चिनी ही मुली शेततळ्यातील पाण्यात बुडून तळाशी गेल्या होत्या, तर आकांक्षा वडजे हिच्या हातात पाण्याचा ग्लास हातामध्ये तसाच होता. ही माहिती मिळताच मार्डीचे पोलीस पाटील अमोल कदम उत्तर तालुका पोलीस निरीक्षक अरुण फुगे हे पोलिसासह दाखल झाले होते. उपस्थित युवकांच्या यांच्या मदतीने शेततळ्यातील पाण्यात उतरून तिनी मृतदेह बाहेर काढून एकाच अंबूलस मध्ये तिघींना सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करिता पाठवण्यात आले. रस्त्यापासून शेततळे लांब असल्याने सांगा म्बुलन्स व चार चाकी गाडी पोचत नसल्याने मृतदेह चादरीत गुंडाळून पोलीस व नागरिकांच्या मदतीने अंबूलन्स वाहना पर्यंत आणण्यात आले.

# स्वामी विवेकानंद जयंती व युवा दिनाचे औचित्य साधून ग्रामीण रुग्णालयात स्वच्छता अभियान!



**वाडा/वार्ताहर**

स्वामी विवेकानंद यांची जयंती हा दिवस युवा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो त्या अनुषंगाने वाड्यात श्रमजीवी संघटना पुरस्कृत श्रमजीवी सेवादल यांच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आला. मार्फत स्वामी विवेकानंद व युवा दिनाचे औचित्य साधून ग्रामीण रुग्णालय वाडा येथे सामाजिक आरोग्य जपावे या दृष्टिकोनातून व श्रमजीवी संघटनेचे युवक स्वावलंबी व्हावेत व युवांना श्रमाचे मूल्य कळावे या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला वंदन करून राष्ट्रीय युवादिन साजरा करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने युवक सहभागी होऊन ग्रामीण रुग्णालय परिसराची स्वच्छता करण्यात आली. यावेळी श्रमजीवी संघटनेचे वाडा तालुका अध्यक्ष भरत भाऊ जाधव, उपाध्यक्ष सुरेशभाऊ पऱ्हाड, तालूका संपर्क प्रमुख रफिक चौधरी, तालुका महिला ठिणगी प्रमुख प्रमिला तरसे, तालुका.सचिव सुरज दळवी, तालुका विभागीय सचिव रेखाताई पऱ्हाड, सेवादल सचिव देवेंद्र वाघ व सक्रिय कार्यकर्ते बाळू लहांगे या कार्यकर्त्यांनी परिसर स्वच्छ केला.

# पात्र, गरजू लाभार्थ्यांची निवड करा; आर्थिक शिस्त पाळा -उपमुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करताना, काटेकोरपणे आर्थिक शिस्त पाळा. महामंडळाच्या योजनांचा लाभ अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविताना समाजातल्या पात्र, गरजू लाभार्थ्यांची निवड करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. त्याचबरोबर सर्व महामंडळांसाठी तरतूद करण्यात आलेल्या निधीचे तातडीने वितरण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी संबंधित यंत्रणेला दिले. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कामाचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयातील समिती कक्षात घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वित्त विभागाचे प्रधान सचिव राजगोपाल देवरा, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. नामदेव भोसले, नियोजन विभागाचे उपसचिव श्री. देसाई, नियोजन विभागाचे अवर सचिव श्री. बोरकर, वित्त विभागाचे सहसचिव श्री. दहीफळे उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्यातील सर्व समाजघटकांच्या शैक्षणिक, आर्थिक उन्नतीसह समतोल सामाजिक प्रगती साधण्यासाठी राज्य सरकारच्यावतीने वेगवेगळ्या प्रवर्गासाठी विविध विकास महामंडळाच्या माध्यमातून योजना राबविण्यात येतात. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील सुशिक्षीत बेरोजगार तरुणांना शेतीपूरक व्यवसाय, विपणन, प्रक्रियाउद्योग, पुरवठा आणि साठवणूकीबरोबरच लघू उद्योग, वाहतुक, अन्य व्यवसायिक उद्योगासाठी आर्थिक मदत करताना राज्यातील सर्व भागातील जास्ती-जास्त तरुणांना या योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न करावा, असेही श्री.पवार यांनी सांगितले. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाबरोबरच महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, श्यामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी व मेंढी विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळासह इतर सर्व महामंडळासाठी तरतुद केलेल्या निधीचे तातडीने वितरण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

# मालेगाव एमआयडीसीमध्ये उद्योग प्रकल्प जलद्गतीने सुरू करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार -सुभाष देसाई

**मुंबई/प्रतिनिधी**

मालेगाव येथील एमआयडीसी जलद्गतीने उभारण्यात आलेली विशेष एमआयडीसी असून, याअंतर्गत असलेली प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत. येथील उद्योग प्रकल्प तातडीने सुरू करण्याबाबत सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. उद्योग नियमावलीप्रमाणे वस्त्रोद्योग पार्क व अजंग प्रकल्पांसाठी भूखंड वाटपाच्या दरास मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी असे उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी कृषी मंत्री दादाजी भुसे यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत सांगितले. मंत्रालयात नाशिक, मालेगाव येथील अजंग-रावळगाव औद्योगिक वसाहत टप्पा क्रमांक ३ येथील प्रलंबित कामाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ पी. अन्बलगन, सहसचिव संजय देगांवकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय काटकर, अवर सचिव किरण जाधव यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. एमआयडीसीअंतर्गत असलेल्या समस्या



कृषीमंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी मांडल्या. त्यांनी मालेगाव येथील उद्योजकांसाठी केलेल्या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. उद्योग मंत्री श्री.देसाई म्हणाले, मालेगाव एमआयडीसी अंतर्गत अजंग गाव ते औद्योगिक वसाहत पोहोच रस्त्यांच्या कामासंदर्भातील कार्यवाही एका महिन्यात पूर्ण करावी. तसेच अभिन्यांसातील अंतर्गत रस्ते तयार करण्यात यावेत. वस्त्रोद्योग पार्क व अजंग टप्पा क्रमांक ३ भुखंड वाटपाच्या रू ६०० प्रति चौमी या दरास मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

यानंतर ७९० प्रमाणे दर करण्यात यावेत. जे प्रकल्प काम सुरू करत आहेत त्यांना तात्पुरत्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी पाणीपुरवठा योजना क्रमांक दोनसाठी तांत्रिक मंजुरी तसेच निविदा प्रक्रियेची प्रक्रिया करण्यात यावी. वीजेसंदर्भातही सध्या तात्पुरत्या स्वरूपात वीज व्यवस्था करून ऊर्जा विभागासोबत पाठपुरावा करून वीजेसाठी सबस्टेशन कार्यान्वीत करावेत. प्लास्टिक, वस्त्रोद्योग, फुड व इतर उद्योगांसाठी सुधारित अभिन्यास मान्यता देण्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश उद्योग मंत्री देसाई यांनी दिले.

# भिवंडीत शासकीय योजनांचे आमिष दाखवून कागदपत्रे घेत वाहन विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश, ३३ दुचाकी जप्त

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरातील गरीब व गरजु नागरीकांना हेरून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आधारकार्ड पॅनकार्ड या कागदपत्रांची मागणी करून तर काहींना कागदपत्रांच्या मोबदल्यात पाच हजार रुपये अथवा सहा महिन्यांनी दुचाकी देण्याचे आमिष दाखवून नागरीकांच्या कागदपत्रांची फसवणूक करीत त्यावर बँक अथवा फायनान्स कंपनी कडून कर्ज घेत दुचाकी काढून त्या परस्पर ५० ते ६० टक्के किमतीला विक्री करणाऱ्या टोळीचा भिवंडी गुन्हे शाखेच्या पथकाने पर्दाफाश केला असून यामध्ये तब्बल ३२ लाख रुपयांच्या दुचाकी जप्त करीत चार जणांच्या टोळीला अटक करण्यात यश मिळविले आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत ठाणे गुन्हे विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांनी दिली आहे.




या बाबत पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार सहा महिन्यांपूर्वी असद समद बेग यास काही जणांनी कागदपत्रांच्या मोबदल्यात दोन फायनान्स कंपनी मधून कर्जावर तीन दुचाकी काढल्याचे त्याच्याकडे फायनान्स कंपनीचे प्रतिनिधी कर्जाच्या हप्त्यांच्या वसुलीसाठी आले असता समजले त्या विरोधात निजामपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असताना त्याचा तपास भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनिरी शरद बरकडे हे समांतर तपास करीत असताना माहितीच्या आधारे शाह मोहम्मद आसिफ मोहम्मद आझम उर्फ बावटा यास ताब्यात घेत त्याच्या कडे कसून चौकशी केली असता त्याने आपल्या साथीदारांच्या मदतीने शहरातील वेगवेगळ्या शोरूम मधून कागदपत्रांच्या आधारे फसवणूक करीत अनेक दुचाकी कमी किमतीत विक्री केल्याचे आढळले. त्याचे साथीदार अल्ताफ लतीफ शेख, शफिक अब्दुल लतीफ अन्सारी, अरबाज आसिफ मोमीन उर्फ देवा या चार जणांच्या मुसक्या आवळत त्यांच्या ताब्यातून तब्बल ३३ दुचाकी ६ मोबाईल असा एकूण ३२ लाख ३६ हजार ४९० रुपयांचा मुद्देमाल गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त लक्ष्मीकांत पाटील, भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोनिरी सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शना खाली पो उप निरी शरद बरकडे, रमेश शिंगे, सपोउपनिरी हनुमंत वाघमारे, रामसिंग चव्हाण, लक्ष्मण फालक, पोहवा सुनील साळुंके, रामचंद्र जाधव, मंगेश शिर्के, सचिन जाधव, साबीर शेख, रंगनाथ पाटील, भावेश घरत, रवींद्र घुगे, नरसिंह क्षीरसागर यांच्या पथकाने आरोपींनी भिवंडी सह मालेगाव या भागात विक्री केलेल्या वाहनांचा शोध घेत जप्त केल्या आहेत.

# मादलापूर येथील पाणीपुरवठा योजनेसाठी निधी मंजूर

**लातूर/प्रतिनिधी**

उदगीर तालुक्यातील मौजे मादलापूर येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेस राज्य शासनाने मंजूरी दिली असुन उदगीर येथील मौ. मादलापुर येथील पाणीपुरवठा योजनेसाठी ११ कोटी ४३ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती राज्याचे पर्यावरण, पाणीपुरवठा राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे. मागील अनेक वर्षापासुन या गावातील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्र्न प्रलंबित होता. या पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून हा प्रश्न कायमस्वरुपी निकाली निघाला आहे. शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत नागरिकांना शुध्द ५५ लिटर पाणी नळाद्वारे देण्यात येत आहे. या योजनेतून प्रत्येक घरात नळ जोडणी देणे आवश्यक असते, यासाठी शासनाने हा निधी मंजूर केला आहे. मौ.मादलापुर या गावासाठी देवर्जन मध्यम प्रकल्प ता. उदगीर येथून पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. या योजनेमधून जल शुध्दीकरण केंद्र, जलकुंभ वितरण व्यवस्था, शुध्द पंपीग मशिनरी उभारण्यात येणार आहे. मादलापूर येथील या पाणी पुरवठा योजनेची त्वरीत अंमलबजावणी करून ही योजना लवकर कार्यान्वीत करण्यात येईल आहे. जलजीवन मिशन अंतर्गत नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे.

# नांदेड शहरात १८ लाखांची धाडसी चोरी; तपास संथगतीने!

**नांदेड/प्रतिनिधी**

नांदेड शहरात खून, मारामाऱ्या आणि धाडसी चोऱ्यांचे सत्र सुरुच असून यावर नियंत्रण आणि अंकुश लावण्यात पोलीस यंत्रणेस अपयश आले आहे. याबाबतीत पोलीस यंत्रणा कुचकामी ठरली आहे. दि.२८/१२/२०२१ रोजी रात्री दोन वाजता चोरट्यांनी वर्धमान नगरमध्ये गुत्तेदाराच्या घरी धाडसी चोरी केली आणि सोन्याचे दागिने व रोकड असा १८ लाख रुपयाचा माल लंपास करून पोलीसासमोर आव्हान उभे केले आहे. अलीकडील काळात घडलेली ही सर्वात मोठी चोरी आहे. यामुळे या नगरात व शहरात दहशत पसरली असून नागरिक रात्र जागून काढीत आहेत. मालेगाव रोडवरील वर्धमान नगरीत गुत्तेदार प्रकाश शेंडगे हे किरायाने राहतात. नगरालगत शांताई नगरात नव्याने घर बांधले व घरगुती पद्धतीने वास्तू शांती केली. रात्री किरायाने रहात असलेल्या घरी वडील झोपण्यास गेले व घरातील इतर सदस्य नव्या घरी झोपले. रात्री ११.५० च्या सुमारास वडील हे किरायाचा घरात झोपले असता. फिर्यादीच्या आईस त्रास होत असल्याने वडिलांना घरी बोलावन्यास प्रवीण शेंडगे भाऊ गेला व दवाखान्यात नेण्याची चर्चा सुरु झाली. चोरांनी हीच संधी साधली व दारास लावलेले कडी कुलूप तोडले व सोन्याचे दागिने आणि रोकड असा एकूण १८ लाख ११ हजार रुपयाची धाडसी चोरी केली. सकाळीमाझा भाऊ व वहिनी किरायाच्या घरात जाऊन पाहिल्यास कपाट व इतर वस्तू व कपडे अस्ताव्यस्त पडलेले दिसले. चोरांनी घर साफ केले. याप्रकरणी प्रकाश शेंडगे यांनी आईच्या उपचारासाठी दवाखान्यात गेले व तिथे दिवसभर थांबावे लागले. नंतर भाग्यनगर पोलीस ठाण्यात तक्रार घेण्यास विनंती केली, पण तक्रार वेळेवर घेतली नाही त्यातही दिरंगाई केली. मग वर्तमानपत्रात बातम्या व सोशल मिडीयावर चर्चा आणि टीका टिप्पणी झाल्यानतर चोरट्याविरुद्ध कलम ४५४, ४५७, ३८० भादविप्रमाने गुन्हा नोंद करण्यात आला. आज १२ दिवस होऊन गेले सदरील प्रकरणात कोणतेही सूत्र हललेली दिसत नाहीत. सदरील तक्रार देणारे प्रकाश शेंडगे हे पोलीस स्टेशनला चकरा मारत आहेत, शोधात कुठलीही प्रगती नाही. सदरील प्रकरणात वरिष्ठांचेही दुर्लक्ष होत आहे. एवढा मोठा दरोडा पडल्यामुळे माझी आई हृदयविकाराच्या आजाराने त्रस्त असून त्या पण गंभीर मनस्थितीत आहेत. पोलीस स्टेशन कडून पुढील तपास पोउपनी कदम हे करीत आहेत.

17 TO 23 JANUARY 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 15/01/2022 8:07 PM Page 1



# क्राईम संध्या पालघर दैनंदिनी डायरी २०२२चे भव्य प्रकाशन!




**वसई/प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात घडणाऱ्या गुन्हेगारी विषयक तसेच सामाजिक घडामोडींचा वेध घेत वाचकांमध्ये प्रचंड लोकप्रिय ठरलेल्या 'क्राईम संध्या' वृत्त पत्राच्या २०२२ च्या दैनंदिनी डायरीचा प्रकाशन सोहळा नुकताच पार पडला. मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील यांच्या हस्ते या क्राईम संध्या पालघर दैनंदिनी डायरी २०२२चे प्रकाशन करण्यात आले. पोलीस आणि जनता यांच्यातील समन्वयाचा एक महत्वाचा दुवा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या क्राईम संध्याच्या दैनंदिनी डायरीचे प्रकाशन करण्याच्या उपक्रमाचे पोलीस उपायुक्तांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या. गेल्या दहा वर्षांपासून क्राईम संध्याच्या या डायरीचा अभिनव उपक्रम सुरु असून या डायरीत पालघर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे तिथल्या अधिकाऱ्यांपासून कॉन्स्टेबलपर्यंत सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचे मोबाईल नंबर या डायरीत असून कधीही कोणते संकट आले तर या डायरीतील नंबर पाहून संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांशी सहजपणे संपर्क साधता येऊ शकतो किंवा एखाद्या घडणाऱ्या किंवा घडून गेलेल्या गुन्ह्याची माहिती पोलिसांना देण्याचे काम या डायरीच्या माध्यमातून होऊ शकते. पोलिसांशी थेट संपर्क साधण्यास मदत करण्याचे काम या डायरीच्या माध्यमातून होऊ शकते. त्यामुळे जिल्ह्यातील पोलीस असो किंवा अन्य विविध क्षेत्रातील लोक असो सर्वासाठी हि डायरी दिशादर्शकाचे काम करणारी आहे. केवळ पोलिसांचेच नाही तर जिल्ह्यातील रुग्णालये इतर सरकारी कार्यालये यांचेही नंबर या डायरीत असल्याने सर्वासाठी हि डायरी उपयुक्त ठरू शकते. या कार्यक्रमाला क्राईम संध्याचे मुख्य संपादक लक्ष्मणराव पाटोळे, दैनिक वृत्त सिंहासनचे संपादक रूपेश वाढे, वसई संकल्पचे संपादक किरण सोलंकी, क्राईम संध्याचे कार्यालयीन उपसंपादक सोनू जाधव, राजरतन दर्शनचे संपादक राजाराम वाव्हळ, एनजीओ प्रमुख मिश्रा तसेच अन्य पत्रकार उपस्थित होते.

# माहिम केळवे धरण गळतीबाबत वेळीच जिल्हा प्रशासनाची उपाययोजना

## जिल्हा प्रशासनाच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला -दादाजी भुसे



**पालघर/प्रतिनिधी**

माहिम केळवे धरण ढासाळल्यामुळे खालील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. तसेच आवश्यकतेनुसार एन डी आर एफ ची टीम सुध्दा तैनात करण्यात आली होती. परिसरातील गावामधील नागरिकांना स्थलांतरीत करण्याची तयारी सुध्दा जिल्हा प्रशासनाने केली होती या उपाययोजना जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांच्या देखरेखीखाली गळती प्रतिबंधक कामे वेळीच जिल्हा प्रशासनाने केल्यामुळे होणारा अनर्थ टाळता आला आहे असे कृषी, माजी सैनिक कल्याणमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले. झांझरोळी गावा जवळील माहिम केळवे लघु ...पान ६ वर

# औषधांच्या गंभीर रिएक्शन झालेल्या लहान मुलावर यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात यशस्वी उपचार

## बालरोग, त्वचारोग, नेत्ररोग तज्ज्ञांची संयुक्त कामगिरी



**लातूर/प्रतिनिधी**

गोळ्या - औषधांच्या गंभीर रिएक्शनमुळे टॉक्सिक एपिडर्मल नेक्रोलिसिस हा आजार झालेल्या आकरा वर्षीय सुमित धम्मा कांबळे या मुलावर एमआयटीच्या यशवंराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील बालरोग विभागात तज्ज्ञांकडून यशस्वी उपचार करण्यात आले. बालरोग तज्ज्ञ डॉ. विद्या कांदे, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. स्मिता चाकोते, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. सय्यद मोहमंद यांनी उपचारासाठी संयुक्तपणे शर्थीचे प्रयत्न करुन सुमितला जीवदान दिले आहे. येथील यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील बालरोग विभागात सुमित धम्मा कांबळे (वय ११ वर्ष, रा. लातूर) या मुलाची बालरोग तज्ज्ञ डॉ. विद्या कांदे यांनी तपासणी केली असता त्याच्या चेहऱ्यावर, छातीवर, पोटावर व हातावर भाजल्यासारखे सर्वत्र फोड येवून त्यात पाणी भरले होते. त्यासोबतच त्याच्या ओठातून, लघवीच्या जागेवरुन रक्त येत होते व डोळ्यांतही रक्तस्त्राव झाला होता. तपासणीअंती त्याला गंभीर ड्रग रिएक्शन झाल्याचे निदान झाले. ...पान ६ वर

# आदिगुरू रेणुकाचार्य संस्कृती भवना करिता दोन कोटी देणार-संजय बनसोडे

**देवणी/प्रतिनिधी**




जंगम समाजासाठी आद्यगुरू रेणुकाचार्य संस्कृती भवनाकरीता दोन कोटी रुपये देण्याची घोषणा उदगीरचे राज्यमंत्री नामदार संजय बनसोडे यांनी लातूर जिल्हा जंगम समाज प्रणित सकल जंगम समाज चारीटेबल ट्रस्ट उदगीर च्या वतीने आयोजित उपवधू उपवर मेळाव्यात ते बोलत होते. उदगीर येथील ललित भवन मंगल कार्यालयामध्ये विविध महास्वामींजी व मान्यवरांच्या उपस्थितीत हा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हावगीस्वामी मठाचे मठाधिपती डॉक्टर शंभोलिंग शिवाचार्य महाराज होते.तर सोलापूरचे खासदार डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामीजी यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. बसवलिंग शिवाचार्य महाराज कवळास, विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेड, शंकर लिंग शिवाचार्य महाराज, हाणेगाव, सिद्धलिंग महास्वामीजी, देवणी यांच्या दिव्य सानिध्यात प्रमुख पाहुणे म्हणून उदगीरचे आमदार राज्यमंत्री नामदार संजय बनसोडे, नगराध्यक्ष बसवराज बागबंदे, उपनगराध्यक्ष सुधीर भोसले, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते बसवराज पाटील नागराळकर, उदगीरचे माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी आमदार मनोहरजी पटवारी, पंचायत समितीचे सभापती शिवाजीराव मुळे, जगदीश स्वामी, शिवकुमार स्वामी, रमेश अंबरखाने, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सिद्धेश्वर पाटील आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सोलापूरचे खासदार जय सिद्धेश्वर शिवाचार्य महाराज व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शंखनाद व स्वागत गीत आणि प्रमुख पाहुण्यांचे सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजयकुमार स्वामी यांनी केले. नामदार संजय बनसोडे या कार्यक्रमात बोलत असताना पुढे म्हणाले की या आर्थिक वर्षामध्ये या संस्कृती भवन करिता एक कोटी तर पुढील आर्थिक वर्षामध्ये एक कोटीची तरतूद करण्यात येईल असे ते सांगितले. या संस्कृती भवना करिता लागणारी जागा या कार्यक्रमाचे अध्यक्ष शंभोलिंग शिवाचार्य महाराज उदगीर यांनी देण्याचे जाहीर केले. या कार्यक्रमास, पत्रकार महेश मठपती, माधव मठवाले, प्रा.रेवण मळभगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या वधू-वर परिचय मेळाव्यात यशस्वी करण्याकरिता मेळाव्याचे अध्यक्ष विजयकुमार मल्लिकार्जुन स्वामी, महालिंग देवर्षे, शांतवीर स्वामी बटनपूरकर, चंद्रशेखर स्वामी, रामलिंग मळभगे, मल्लिकार्जुन स्वामी चांदेगावकर, लक्ष्मीकांत मल्लिकार्जुन स्वामी, संतोष शिवराम स्वामी, महेश झुंगा, शशिकांत स्वामी, किर्तीकुमार देवणीकर, जगदीश स्वामी, मल्लिकार्जुन स्वामी हाडोळतीकर, शिवराज स्वामी डिगोळकर, विनोद मठपती, अशोक मठपती, डॉक्टर बसवराज स्वामी, मनोहर स्वामी, संतोष स्वामी, हावगी स्वामी, मन्मथ स्वामी, त्रिंबक स्वामी, रविकांत स्वामी, अमर स्वामी, ...पान ६ वर

# पिळंझे ग्रामपंचायत क्षेत्रातील खडीमशीनमुळे डोंगराला धोका

## आदिवासी जमिनीवर अतिक्रमण, प्रांताधिकारी निद्रावस्थेत



**भिवंडी/प्रतिनिधी**

तालुक्यातील पिळंझे ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्वे नंबर १७ मध्ये अनधिकृत डोंगर फोडण्याचे काम सुरु असून येथील डोंगराला मोठा धोका निर्माण झाला आहे. त्याच प्रमाणे येथील आदिवासी वस्तीमधील नागरिकांना धमकावून त्यांच्या जागेत खाडीमशीन उभारली असून आदिवासी यांच्या जागेचे रक्षण होण्यासाठी काँग्रेस ठाणे जिल्हा कमेटीचे सरचिटणीस पंकज गायकवाड यांनी थेट ठाणे जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे. मात्र भिवंडी प्रांताधिकारी बाळासाहेब वाघचौरे यांच्यासह त्यांची महसूल यंत्रणा मात्र निद्रावस्थेत असल्याचे पाहावयास मिळत आहे. पिळंझे ग्रामपंचायत क्षेत्रातील आदिवासी यांच्या जमिनीवर जबरदस्तीने आदिवासी बांधवांना धमकावून त्यांच्या जागेत मायनिंग केले जात असून त्यामध्ये शेकडो ब्रास गौण खनिज उत्खनन केले जात आहे. त्यामुळे लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, तर डोंगराला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे आदिवासी बांधव हे उत्खनन थांबवण्यासाठी यावर आवाज उठवत, न्याय मागत असल्याने त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी तेथील दगड फोडण्याचे काम करणारी मंडळींकडून देण्यात येत असल्याने आदिवासी बांधव भयभीत झाले असून आमच्या आदिवासी वस्तीला पोलीस संरक्षण मिळावे आणि आम्हाला या त्रासापासून मुक्तता मिळवून आमच्या जमिनी आमच्या ताब्यात मिळाव्यात, यासाठी येथील आदिवासी बांधवांनी काँग्रेसचे ठाणे जिल्हा सरचिटणीस पंकज गायकवाड यांच्याकडे आपल्या व्यथा मंडल्याने त्यांनी तात्काळ आदिवासी बांधव त्यांच्यावरील अन्यायाच्या विषयी ठाणे जिल्हाधिकारी डॉ. राजेश नार्वेकर यांना सविस्तर निवेदन दिले असून यावर सर्व चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यावर जिल्हाधिकारी यांनी आश्वासन दिले आहे. मात्र डोंगर फोडण्याचे काम सुरु असल्याने डोंगराला मोठा धोका निर्माण झाला असताना देखील भिवंडी प्रांत अधिकारी बाळासाहेब वाघचौरे यांच्यासह त्यांची महसूल यंत्रणा मात्र निद्रावस्थेत असल्याचे पाहावयास मिळत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनीच आता लक्ष देण्याची गरज असल्याचे काँग्रेसचे ठाणे जिल्हा महासचिव पंकज गायकवाड यांनी प्रतिनिधिशी बोलताना सांगितले आहे.

# औसा शहरातील स्वयं रोजगाराचे आमिष दाखवून महिला बचत गटास २४ लाखांचा गंडा

**औसा/शिवाजी मोरे**



औसा शहरातील स्वयंसहायता महिला बचत गटास स्वयंरोजगारासाठी कर्ज देण्याचे आमिष दाखवून बचत गटातील महिलांना २४ लाखास फसवले असल्यांची घटना घडली आहे. या प्रकरणी अंतर्नाद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड अकोला या संस्थेच्या तीन संचालका विरोधात औसा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी औसा पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, आकोला अंतर्नाद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेचे संचालक स्कायलॅब शामराव सातपोते, राजेंद्र वानखेडे आणि अर्पिता घोष यांनी औसा येथील स्वयंसहायता महिला बचत गटास अगरबत्ती चा व्यवसाय करण्यासाठी कच्चामाल व मशिनरी उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवले. आगबत्ती बनविण्यासाठी लागणाऱ्या मशीनची किंमत १ लाख ६० हजार रुपय असून मशीन आम्ही तुमच्या बचत गटास देऊ तसेच तुमच्याकडे तयार झालेला कच्चामाल आम्ही ६३ रुपये किलो दराने अगरबत्ती घेऊन जाऊ असे सांगून विश्वास मिळवला. प्रत्यक्ष महीला बचत गटाने स्वयंरोजगार उभारून आगरबत्ती उत्पादन केले. मात्र सदरील कंपनीने दिलेला शब्द न पाळता वेळोवेळी विनंती करूनही महिला बचत गटाने तयार केलेला अगरबत्तीचा माल घेण्यास टाळाटाळ केली. याप्रकरणी सुरेखा विनायक मुंजाळ यांच्या फिर्यादीवरून औसा पोलिसात अंतर्नाद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड च्या तीन संचालकांविरुद्ध भादवि कलम ४२०, ४०६ व ४३४ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. बचत गटाच्या महिलांना अगरबत्ती तयार करण्यासाठी लागणारा कच्चामाल व बांबूच्या काड्या देण्याचे आमिष दाखवून वेळोवेळी विनंती करूनही कच्चामाल न पुरवल्यामुळे बचत गटाच्या महिलांची २४ लाखांची फसवणूक झाली आहे.याप्रकरणी पोलिस हेड कॉन्स्टेबल बिराजदार आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक डोंगरे पुढील तपास करीत आहेतमहिला बचत गटाला २४ लाखाला गंडा घातला आहे.

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन!




**लातूर/प्रतिनिधी**

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त संकुलाचे प्रमुख प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य केंद्रे म्हणाले की, सोळाव्या शतकात आदिलशाही, कुतूबशाही, मोगलांसारख्या परकियांची जुलमी सत्ता भारत देशावर होती. ते देशाचे सर्व प्रकारचे शोषण करून अन्याय करीत होते. त्या विरूध्द लढण्याची ऊर्जा शक्ती रामायण - महाभारताचे दाखले देऊन राजमाता जिजाऊ यांनी बाल शिवाजी महाराजांना दिली. त्यामुळेच ते दृढ आत्मविश्वासी, लढवैय्ये, जनतेचे पोशिंदे व स्वराज्य निर्माते म्हणून उदयास आले. महिला, तरुणी व मुलींवर अत्याचार होत असलेल्या सध्याच्या काळात अशा महान मातेच्या विचारांची आज खर्या अर्थाने गरज आहे. आजच्या मातांनी आपल्या मुलांना जिजाऊंप्रमाणे आदर्शवादाचे धडे देऊन त्यांच्यावर सुसंस्कार करण्याची गरज आहे. स्वामी विवेकानंदांनी संपूर्ण जीवन देशातील पुरानमतवादी भोंगळवाद दूर करून वेदावर आधारीत खरा धर्म काय आहे तो सांगण्याचा प्रयत्न केला. तरुणांनी जीवन कसे व्यतीत करावे? या बद्दल मार्गदर्शन करुन त्यांना जीवनाचा ...पान ६ वर

# अवघ्या दहा दिवसात वाड्यातील ५० टक्के पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण!



**वाडा/प्रतिनिधी**

कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तविली जात असतानाच शासनाकडून लसीच्या सत्राचे प्रमाण वाढवल्याने नागरिकांनी पहिला व दुसरा डोस घेऊन झाला असतानाच १५ ते १८ वयोगटातील किशोर वयीन मुला-मुलींच्या लसीकरणासही प्रारंभ केला आहे. ३ जानेवारी पासून जिल्ह्यातील सर्वच शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व शाळा महाविद्यालयातुन लसीकरण मोहीम सुरू केली आहे. या संदर्भात तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय बोरपुल्ले यांच्याकडे विचारणा केली असता शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लसीकरणाला चांगला प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसातच १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांचे १०० टक्के लसीकरण होईल असे सांगितले.

# वाडा येथे मकर संक्रांतनिमित्त पतंग महोत्सव साजरा



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा नगरपंचायतीचे नियोजन व आरोग्य समाजकल्याण सभापती व नगरसेवक रामचंद्र भोईर यांच्या संकल्पनेतून मकर संक्रांत निमित्त शुक्रवारी पतंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. संध्याकाळच्या सुमारास वाड्यातील अंजनी नगर येथे आयोजित पतंग महोत्सव २०२२ च्या कार्यक्रमाचे उदघाटन भाजपाचे शहर अध्यक्ष हर्षल खांबेकर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या प्रसंगी बाबाजी कठोले यानी भेट दिली तसेच गतनेते मनीष देहरकर, तालुका सरचिटणीस रोहन पाटिल, शहर अध्यक्ष हर्षल खांबेकर पाणीपुरवठा सभापति अरुण खुलात वाडा नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष भानुदासजी भानुशाली, नगरसेविका रीमा गंधे, सुचिता पाटिल, विशाखा पाटील, बांधकाम सभापति भारती सपाटे जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस कुनाला साळवी भाजपा नेते मिलिंद वाडेकर, प्रसाद सोनटक्के, आशीष पवार, कैलास गवळी, सचिन पटेल, राजू समेळ आदी मान्यवर उपस्थित होते. तर बच्चे कंपनीसह तरुण व जेष्ठांनीही पतंग उडविण्याचा मनसोक्त आनंद घेतला. या प्रसंगी आयोजकांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

C M Y K